सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १९२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## कोणीच कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो
## अमेरिकन टॅरिफवरुन राजनाथ सिंह यांचे मोठे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नवी दिल्ली**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण शिखर परिषदेदरम्यान मोठे वक्तव्य केले आहे. राजनाथ सिंह म्हणाले की, आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो, फक्त कायमचा हितसंबंध असतो. राजनाथ यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा अमेरिका आणि भारत यांच्यातील संबंधांमध्ये टॅरिफच्या मुद्द्यावरुन तणाव वाढला आहे. तसेच, भारत-चीन संबंध सुधारत आहेत.



राजनाथ सिंह पुढे म्हणाले, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती झाली आहे. आयएनएस हिमगिरी आणि आयएनएस उदयगिरी यासह दोन नीलगिरी श्रेणीतील युद्धनौका देशात तयार करण्यात आल्या आहेत. स्वावलंबनाच्या दिशेने हे मोठे पाऊल आहे. नौदलाने इतर कोणत्याही देशाकडून युद्धनौका खरेदी न करण्याचा संकल्प केला आहे.

५०% अमेरिकन टॅरिफचा संदर्भ देत संरक्षण मंत्री म्हणाले की, सध्या जागतिक स्तरावर व्यापारासाठी युद्धासारखी परिस्थिती आहे. विकसित देश अधिकाधिक संरक्षणवादी होत आहेत, परंतु भारत आपल्या राष्ट्रीय हितांशी तडजोड करणार नाही. अस्थिर भू-राजकारणात आता स्वावलंबन ही एक गरज बनली आहे. बदलत्या भू-राजकारणामुळे हे देखील स्पष्ट झाले आहे की, संरक्षण क्षेत्रात बाह्य अवलंबित्व आता आपल्यासाठी पर्याय नाही.

भारताची संरक्षण निर्यात २०१४ मध्ये ७०० कोटी रुपयांवरून आज सुमारे २४,००० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. ऑपरेशन सिंदूरवर बोलताना संरक्षण मंत्री सिंह म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने केलेल्या अचूक हल्ल्यांनी स्वदेशी संरक्षण प्रणालींची उपयुक्तता सिद्ध केली आहे. ज्याप्रमाणे एखादा खेळाडू काही सेकंदात शर्यत जिंकतो, परंतु त्यामागे वर्षानुवर्षे कठोर परिश्रम असतात. त्याचप्रमाणे, आपल्या सैन्यानेही वर्षानुवर्षे तयारी, कठोर परिश्रम घेतले आहेत.

## हैदराबाद गॅझेट लागू करण्याला सरकारची तत्वत: मंजुरी
### न्यायमूर्ती शिंदे समितीचा मनोज जरांगेंना शब्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आज (३० ऑगस्ट) माजी न्यायमूर्ती समितीचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी मनोज जरांगे पाटील यांची आझाद मैदानात जाऊन भेट घेतली. यावेळी सातारा आणि हैदराबाद गॅझिटियरच्या नोंदीनुसार प्रमाणपत्र देण्याची मागणी मनोज जरांगे यांनी केली. तर शिंदे समितीकडून सहा महिन्यांचा वेळ मागितला. मात्र मराठा समाजाला कुणबी घोषित करा त्याशिवाय इथून उठणार नाही, असं मनोज जरांगे यांनी स्पष्ट केलं. तसेच हैदराबाद गॅझेटसंदर्भात तत्वत: मान्यता मंत्रिमंडळाने दिली आहे, अशी महत्वाची माहिती शिंदे समितीने दिली.



**मनोज जरांगेंच्या भेटीनंतर शिंदे समितीचे अध्यक्ष काय म्हणाले ?**

काही प्रमाणात समाधान झालं आहे. आता मंत्रिमंडळाशी चर्चा केल्यानंतर पुढची चर्चा होईल. आता उपसमितीकडे जात आहे. काही गोष्टींना तत्वता मान्यता दिली आहे. त्यावर जरांगेंची काही मतं आहेत ती मंत्रिमंडळाला सांगण्यात येतील. त्यानंतर अंतिम निर्णय मंत्रिमंडळ घेईल. हैदराबाद गॅझेटसंदर्भात तत्वत: मान्यता मंत्रिमंडळाने दिली आहे, अशी महत्वाची माहिती शिंदे समितीने दिली. कोंडी सुटण्याच्या संदर्भात मंत्रीमंडळ निर्णय घेईल. आम्ही निर्णय घेऊ शकत नाही, असंही न्यायमूर्ती शिंदे समितीने स्पष्ट केलं.

**मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर काढा**

शिंदे समितीनं १३ महिने अभ्यास केला, आता मराठवाड्यातील मराठा कुणबी असा अहवाल द्या, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. ५८ लाख नोंदी हा कुणबी आणि मराठा एकच असल्या पुरावा आहे. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर काढावा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. सरसकट मराठे कुणबी ठरत नाहीत तर ओबीसीत जात सरसकट कशी जाते,असा सवाल मनोज जरांगे यांनी केला.

## वाल्मिक कराडला सुट्टी नाही; सरपंच हत्याप्रकरणी बीड न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बीड**

जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या वाल्मिक कराडचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे. कारण, बीडच्या जिल्हा व विशेष सत्र न्यायालयात वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर आज सुनावणी पार पडली. या दरम्यान न्यायालयाने आरोपी वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, वाल्मिकच्या अडचणीत आणखी वाढ झाली असून तुरुंगातून त्याची सुट्टीच नाही, हे स्पष्ट झालं आहे. दरम्यान, सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्यानंतर बीडसह राज्यभरातून संतापाची लाट पाहायला मिळाली. विधिमंडळातही हे प्रकरण चांगलंच गाजलं होतं. त्यानंतर, बीडमधील नेते आणि आमदार धनंजय मुंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देखील द्यावा लागला.




दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडचा संबंध कशाप्रकारे नाही, असा युक्तिवाद मागील सुनावणीत कराडच्या वकिलांच्या माध्यमातून तब्बल तीन तास करण्यात आला होता. तसेच, या प्रकरणात वाल्मिक कराडला जामीन मिळावा यासाठी विशेष न्यायालयात अर्ज देखील दाखल करण्यात आला होता. त्यावर निर्णय देत आज न्यायालयाने हा अर्ज नामंजूर करत फेटाळून लावला. त्यामुळे आता कराडच्या वकिलांकडून पुढे काय पावलं उचलली जातात? याकडेच लक्ष लागले आहे. वाल्मिक कराडवर गंभीर गुन्हा दाखल असल्याने कराडचा अर्ज फेटाळत असल्याचं निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. दरम्यान, वाल्मिक कराडसह ५ आरोपींना पोलिसांनी सरपंच देशमुख हत्याप्रकरणात अटक केली असून अद्याप एक आरोपी फरार आहे. पोलिसांकडून त्या आरोपीचा शोध घेतला जात असल्याचे सांगण्यात येते.

**दोषमुक्ती अर्जावर १० सप्टेंबर रोजी सुनावणी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणातील आरोपींचे जामीन आणि दोषमुक्ती अर्जावर आज न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयात झालेल्या सुनावणीत काही आरोपींच्या अर्जांवर निर्णय राखून ठेवण्यात आला. तर काही अर्जांबाबत मूळ फिर्यादीचे म्हणणे न्यायालयासमोर न आल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली. या खटल्यातील महत्त्वाचा आरोपी वाल्मिक कराड याच्या जामिनाबाबत निर्णय देत जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. तर, काही आरोपींनी केलेल्या दोषमुक्तीच्या अर्जावरील सुनावणी १० सप्टेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. आजच्या सुनावणीनंतर पुन्हा एकदा हा खटला चर्चेत आला असून, पुढील तारखेला होणाऱ्या सुनावणीवर सर्वांचे लक्ष केंद्रीत झाले आहे.

## पुल कोसळायच्या मार्गावर आणि प्रशासन मेकअपमध्ये गुंतले
### सार्वजनिक बांधकाम विभागाने केली अडीच कोटींची उधळपट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

शहरातील राजकमल आणि जयस्तंभ चौक ते रेल्वे स्थानक, हमालपुरा मार्गाला जोडणाऱ्या अत्यंत महत्वपूर्ण अशा रेल्वे उड्डाणपुलावरून सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आल्याने नागरिकांचे चांगलेच हाल होत आहेत. हा पूल अत्यंत धोकादायक स्थितीत पोहोचल्याचे संरचनात्मक लेखापरीक्षणात (स्ट्रक्चरल ऑडिट) आढळून आल्यानंतर वाहतूक तडकाफडकी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. पण, हा उड्डाणपूल जीर्ण झाला असताना या पुलाच्या सौंदर्यीकरणावर सुमारे दोन ते अडीच कोटी रुपये खर्च करण्याचे औचित्य काय होते, असा सवाल काँग्रेसने केला असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना यासंदर्भात जाब विचारला आहे.



दोन वर्षांपूर्वी आपल्या विभागामार्फत शासनाकडे या उड्डाणपुलाच्या दुरुस्ती अथवा पुनर्बांधणीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत पत्र पाठवण्यात आले होते. परंतु, आश्चर्याची बाब म्हणजे, स्ट्रक्चरल ऑडिटद्वारे हा उड्डाणपूल जीर्ण झाला असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही, सार्वजनिक बांधकाम विभागाने सौंदर्यीकरणासाठी अंदाजे २ ते २.५ कोटी रुपये इतका निधी खर्च केल्याची माहिती समोर आली आहे.

जीर्ण उड्डाणपुलाच्या सौंदर्यीकरणासाठी २ ते २.५ कोटी रुपये खर्च करण्यामागील उद्देश आणि औचित्य काय होते? सौंदर्यीकरणासाठी वापरण्यात आलेला निधी कोणत्या स्रोतातून प्राप्त झाला होता? या कामासाठी निविदा प्रक्रिया कशा प्रकारे राबवण्यात आली? सदर कामाचे कंत्राट कोणत्या कंत्राटदाराला देण्यात आले? या प्रकल्पाची एकूण अंदाजित रक्कम किती होती? कामाचा कार्यकाळ किती होता, सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण झाले आहे का? सौंदर्यीकरणामध्ये नेमकी कोणती कामे समाविष्ट होती? उड्डाणपूल जीर्ण झाला असताना सौंदर्यीकरणाची कामे का करण्यात आली?, हे प्रश्न काँग्रेसने उपस्थित केले आहेत.

जनतेच्या पैशांचा गैरवापर हा गंभीर स्वरूपाचा भ्रष्टाचार असून या सर्व प्रश्नांची सविस्तर आणि लेखी माहिती येत्या सात दिवसांत उपलब्ध करून द्यावी.अन्यथा, अमरावती शहर काँग्रेसच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर जनआंदोलन उभारण्यात येईल. यामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही अनुचित प्रकाराची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील, असा इशारा शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलू शेखावत यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

रेल्वे उड्डाणपूल बंद झाल्याने पूर्व ते पश्चिम या भागात ये-जा करणाऱ्या अमरावतीकरांना फेरा घालून जावे लागत आहे. त्यातच इर्विन चौक ते राजापेठ मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये रोष आहे. त्यातच या जीर्ण पुलावर कशासाठी खर्च करण्यात आला, असा प्रश्न विचारला जात आहे.

**आजपर्यंत पर्यायी व्यवस्था नाहीच**

शहरातील राजकमल आणि जयस्तंभ चौक ते रेल्वे स्थानक, हमालपुरा मार्गाला जोडणाऱ्या अत्यंत महत्वपूर्ण अशा रेल्वे उड्डाणपुलावरून सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आल्याने नागरिकांचे चांगलेच हाल होत आहेत.मात्र चार दिवस उलटूनही या वर आज पर्यंत कुठलाही तोडगा काढण्यात आला नाही हे विशेष

## राजकारण चुलीत गेलं, पण दोन समाज झुंजवणे योग्य नाही; गणरायाच्या साक्षीने मुख्यमंत्र्यांची स्पष्ट भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०मुंबई**

मराठा आरक्षणासाठी लढा देणारे उपोषकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस असून मुंबईतील आझाद मैदानात मोठ्या संख्येने राज्यभरातून मराठा बांधव जमले आहेत. दुसरकीडे सरकारने जरांगे पाटील यांच्याशी चर्चेची तयारी सुरू केली असून मराठा आरक्षणासाठीच्या शिंदे समितीचे प्रमुख माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे हे आझाद मैदानावर चर्चेसाठी पोहोचले. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एबीपी माझाच्या कार्यालयात



बाप्पांची आरती केल्यानंतर मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सविस्तरपणे माहिती दिली. राजकारण चुलीत गेलं, पण समाजा-समाजात तेढ करणं आमच्या तत्वात बसत नसल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासंदर्भात सरकारची भूमिका पहिल्या दिवशीपासून स्पष्ट आहे. २०१४ पासून ते २०२५ पर्यंत मराठा समाजाच्या जे जे हिताचे निर्णय झाले ते आमच्या सरकारनेच घेतले. त्यात, आरक्षणाचा विषय असेल, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आपण एवढं सबळ केलं की, आज दीड लाख उद्योजक जे नोकऱ्या देणारे मराठा तरुण तयार करु शकलो. सारथीमुळे एमपीएससी आणि युपीएससीमध्ये मराठा तरुणांचा टक्का वाढलेला आहे, शिक्षण आणि रोजगार या प्रश्नावर आपण निर्णय घेतलेले आहेत. जे १० टक्के आरक्षण आपण दिलंय, ते टिकलेलं आहे. पण, काहींची वेगवेगळी मतं आहेत, असे म्हणत राज्यात युती आणि महायुतीच्या सरकारनेच मराठा समाजासाठी चांगले निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी एबीपी माझाच्या स्टुडिओतून सांगितलं.

कोणत्या राज्याला वाटत असेल की, आपल्या राज्यातील मोठा घटक असंतुष्ट राहावा, त्याच काय फायदा आहे. पण, एकाच्या संतुष्टीकरता दुसऱ्याला त्याच्यासमोर भांडणासाठी उभं करा, दुसऱ्याला असंतुष्ट करा हे आम्हाला मान्य नाही. राजकारण चुलीत गेलं पण अशाप्रकारे समजा-समाजामध्ये तेढ निर्माण करणं हे आमच्या तत्वात कुठेही बसत नाही. म्हणून, आमचा प्रयत्न हा सगळ्याचं समाधान कसं निघेल हा आहे, ते संविधानाच्या चौकटीत बसवून काढावं लागेल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट शब्दात सांगितलं.

## सोन्याच्या दरात २ हजार ५०० रुपयांची वाढ
### अमेरिकेच्या टॅरीफचा परिणाम, आणखी दरवाढीचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**

अमेरिकेने भारतावर लावलेल्या ५० टक्के टॅरीफचा सोन्याच्या दरावर परिणाम झाला आहे. गेल्या २४ तासात सोन्याच्या दरात २ हजार ५०० रुपयांची मोठी वाढ झाली आहे. सोन्याचे दर हे १ लाख ०७ हजार रुपयांच्यावर जाऊन पोहोचले आहेत. अजूनही सोन्याच्या दरवाढीचा अंदाज असल्यानं अनेक ग्राहकांनी सोने खरेदीसाठी आज गर्दी केल्याचं पाहायला मिळत आहे.



वाढलेल्या सोन्याच्या दराने जीएसटी सह १ लाख ७ हजार रुपयांचा टप्पा गाठला असल्याचं पाहायला मिळत आहे. आगामी काळात सोन्याचे दर अजूनही वाढण्याची शक्यता लक्षात घेता, पुढील काळात लग्न सराई असलेल्या अनेक ग्राहकांनी सोने खरेदीसाठी मोठी गर्दी केल्याचं पाहायला मिळत आहे. डोनाल्ड ट्रम यांनी भारतावर लावलेल्या टॅरीफमुळे रुपयाचा तुलनेत डॉलर वधारला आणि रुपया घसरला आहे. सोन्याच्या दरात ही वाढ झाल्याचं सुवर्ण व्यावसायिक सांगत आहेत.

## संपादकीय ......

# हे गणराया, भक्तांना हक्कांसाठी जागं कर!

हे बुद्धीदेवता, तू विवेक देतोस, चांगल्या-वाईटाचा निर्णय घेण्याची ताकद देतोस. पण राजकारण्यांनी तर बुद्धीचे धिंडवडे काढले आहेत. भक्तांना सुखसोयी मिळाव्यात, रस्ते खड्डेमुक्त व्हावेत, नाल्यांची सफाई व्हावी एवढं सोपं गणित त्यांच्या लक्षात येत नाही. त्यांना कळतं ते फक्त प्रचाराचं गणित. एखाद्या मंडळाला परवानगी लवकर द्यायची, कारण ते आपलं मतपेटीचं केंद्र आहे, दुसर्याला अडथळे उभे करायचे, कारण ते विरोधकांचं आहे. हे कोणतं शहाणपण? हे बुद्धीदेवता, सत्ताधार्यांच्या बुद्धीत प्रकाश पाड आणि त्यांना खर्या जनसेवेची सुबुद्धी दे.

हे मंगलमूर्ती, तुझ्या आगमनाने रोगराई नाहीशी व्हावी असा विश्वास भक्तांना असतो. पण महापालिकेच्या आळशीपणामुळे रोगराईचं स्वागत केलं जातं. नाल्यांत साचलेलं पाणी, कचर्याचे ढीग, डासांची पैदास या सगळ्यामुळे डेंग्यू-चिकनगुनिया फुलून येतो. तुझ्या मिरवणुकीच्या रस्त्यांवरून भक्त नाचत-गात जातात, पण त्या रस्त्यांवर दुर्गंधीचं साम्राज्य पसरलेलं असतं. हीच का ती मंगलमय तयारी? लोकांनी तुला आरती करावी की नाक दाबून कचराकुंड्या टाळत चालावं? जर प्रशासनाने वेळेत गटारसफाई केली, कचर्याची विल्हेवाट लावली, तरच तुझा खरा मंगल सोहळा होईल. नाहीतर रोगराईचं साम्राज्य आणि मंगलमूर्तीचा उत्सव हे फार मोठं विडंबन ठरेल. हे मंगलमूर्ती, आमच्या अंगणात रोगराई नव्हे तर मंगलाचा दरवळ पसरू दे.

हे विनायका, तुझ्या नावाचा अर्थच आहे अडथळे नाहीसे करणारा. पण शासनाचं कामच आहे अडथळे उभे करणं. आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणुकीसाठी रस्ते मोकळे असायला हवेत, घाटांवर सुरक्षा असायला हवी, गटारं वेळेत साफ व्हायला हवीत. पण वास्तव वेगळंच दिसतं. पावसाळ्यात रस्ते तळं बनतात, घाटांवर प्रकाशयोजना अपुरी असते, अपघात घडले की मग 'चौकशी करू' या जुमल्यामागे सरकार लपून बसतं. तू विनायक होऊन भक्तांना आनंद देतोस, पण सरकार मात्र विनायक नव्हे तर 'विघ्नायक' ठरतं. मग भक्तांनी तुझ्या नावाची आरती करायची की शासनाच्या दिरंगाईचा निषेध करायचा? हे विनायका, आमच्यातील धैर्य वाढव आणि या कृत्रिम विघ्नायकांना जनता खर्या अर्थाने धडा शिकवू दे.

हे विघ्नहर्त्या, तुझं आगमन म्हणजे विघ्न दूर करणारा आनंदाचा सोहळा असावा, पण रस्त्यांवरील अडचणी, स्वच्छतेचा अभाव, प्रशासनाचा निष्क्रियपणा यामुळे भक्त त्रस्त होतात. विसर्जनावेळी वाहतूक कोंडी होते, गर्दीवर नियंत्रणासाठी आवश्यक पोलीस अपुरे पडतात, वैद्यकीय मदतकेंद्रांची फक्त नावे दिसतात. एखादी दुर्घटना घडली की मग सरकार 'चौकशी करू' म्हणत जबाबदारी झटकून बसतं. भक्तांचा जीव धोक्यात घालून उत्सव साजरा करणं म्हणजे भक्तीची विटंबना नाही का? हे विघ्नहर्त्या, भक्तीच्या नावाखाली चालणार्या या निष्काळजीपणाला तू उघड कर आणि आमच्यात सजगतेचा दीप पेटव.

हे बुद्धीदेवता, राजकारण्यांनी तुला 'विकासाचा देव' म्हणून गौरवलं, पण विकासाच्या नावाने बुद्धीची खिल्ली उडवली. शहर स्वच्छ ठेवणं, विसर्जन घाट सुरक्षित करणं, प्रदूषणावर उपाय करणं ही मूलभूत कामं आहेत. पण ती सोडून हे नेते मूर्तींच्या आकारावर, मंडपांच्या रोषणाईवर वाद घालतात. जिथे लोकांना मूलभूत सोयी हव्या आहेत तिथे हे 'मोठं कोण?' या अहंकाराच्या नादात गुंग आहेत. हीच का त्यांची शहाणपणाची पद्धत? हे बुद्धीदेवता, या नेत्यांच्या मनातील अहंकार वितळव आणि त्यांच्या डोक्यात खरी लोकसेवेची जाणीव जागव.

हे मंगलमूर्ती, तुझा उत्सव गरीब-श्रीमंत, लहान-मोठ्या मंडळांचा आहे. पण सरकारच्या सोयींच्या अभावामुळे लहान मंडळांनाच सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. मोठ्या मंडळांना प्रायोजक मिळतात, त्यांची स्वतःची व्यवस्था असते. पण छोट्या गल्लीतल्या गणपतीला पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यावर कचर्याचा ढीग, पोलिसांची अनुपस्थिती हेच सामोरं येतं. हे मंगलमूर्ती, लहानग्या भक्तांच्या उत्साहालाही सोयी मिळोत, अशी कृपा कर.

हे विघ्नहर्ता, आम्ही तुझ्याकडे गार्हाणं मांडतो कारण सत्ताधार्यांवर विश्वास ठेवणं म्हणजे स्वतःची फसवणूक करणं आहे. तुझ्या कृपेने आम्हाला सजगता लाभावी, जेणेकरून आमच्या हक्कांसाठी आम्ही आवाज उठवू शकू. स्वच्छ रस्ते, सुरक्षित घाट, सज्ज रुग्णवाहिका, योग्य कचरा व्यवस्थापन हे असेल तरच तुझा उत्सव खराच विघ्नमुक्त होईल. अन्यथा दरवर्षीची तीच दुर्दशा आणि दरवर्षी तुझ्या नावावर विघ्नांची जत्रा. हे विघ्नहर्ता, भक्तांच्या आवाजात ताकद आण, जेणेकरून जनता स्वतःच विघ्नं हरवेल.

हे गणनायका, तुझं नायकत्व लोकांना जोडणारं आहे, पण इथले गणनायक म्हणजे फुटीरतेचे बादशहा. कालपर्यंत ज्यांना 'शत्रू' म्हणाले, आज त्यांच्यासोबत हातमिळवणी करतात. मतदारांच्या भावनांना लोण्यासारखं मळतात आणि स्वतःच्या पदासाठी कोणत्याही दारात माथा टेकतात. तू गणांचा नायक होतोस, पण हे गणनायक फक्त खुर्च्यांचे गुलाम आहेत. लोकांना दिशा देणं त्यांना परवडत नाही, मतांची बेरीज आणि विभागणी हाच त्यांचा जीवनमंत्र. हे गणनायका, जनता खरी एकजूट राखो आणि खोट्या गणनायकांना दूर करो.

हे एकदंत, तुझं एकच दंत हे स्थैर्याचं प्रतीक आहे, पण इथले नेते रोज नवा दात दाखवतात. सकाळी एका पक्षात, दुपारी दुसर्यात, रात्री तिसर्यात ही त्यांची राजकीय दिनचर्या. लोकांनी टाकलेलं मत हा विश्वासाचा दंत असतो, पण हे तोच दंत पाडून टाकतात. हे एकदंत, आमच्या विश्वासाचा दंत अखंड टिकू दे.

हे लंबोदरा, तुझ्या उदरात जगाचं मंगल साठलंय, पण सरकारच्या भूतलाच्या उदरात काय आहे? अपूर्ण प्रकल्पांची हाडं, अव्यवस्थेची चरबी, अपयशाचं आम्लपित्त. तू लंबोदर म्हणून भक्तांना समाधान देतोस, पण हे सरकार उदर फक्त मतांच्या गोळ्यांनी भरतं. तुझ्या उदरात दया आहे, इथे उदरात फक्त 'व्यवहारां'चे हिशेब. खरं सांगायचं तर या सत्ताधार्यांचं उदर म्हणजे एक भ्रष्ट तिजोरी आहे, जिच्यात जनतेचे हक्क आत बंद आहेत आणि बाहेर फक्त 'महोत्सवा'चा गाजावाजा सुरू आहे. हे लंबोदरा, सत्तेच्या उदरातला हा कचरा बाहेर फेक आणि जनतेच्या हक्कांचं धन पुन्हा उघड कर.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात साजरा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३०अमरावती–** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय क्रीडा दिन' साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आज मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली. खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार संजय खोडके यांच्या हस्ते क्रिडा दिनाचे उद्घाटन झाले. यावेळी शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. नितीन चव्हाळ आणि जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अजय आळशी उपस्थित होते. डॉ. अनिल बोंडे आणि आमदार संजय खोडके यांनी मेजन ध्यानचंद यांच्या जीवनपैलू वर प्रकाश टाकला. तसेच 'फिट इंडिया' पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीनिमित्त क्रीडा आणि खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. मॅरेथॉन स्पर्धेत पुरुषांमध्ये प्रथम उजेर खान, द्वितीय प्रतिक गेडाम आणि तृतीय गौरव इंगळे यांनी रोख बक्षीस पटकाविले. महिलांमध्ये प्रथम वैष्णवी वानखडे, द्वितीय पायल मगरदे आणि तृतीय गायत्री बेहरे क्रमांक पटकाविला. त्यांना रोख बक्षीस, पदके आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी 'एक घंटा खेल के मैदान मे', 'खेलेगा छात्र तो खेलेगा राष्ट्र', आणि 'खेले भी खिले भी' असे नारे देण्यात आले. सहभागी खेळाडू, नागरिक आणि प्रशिक्षकांनी क्रीडा दिनानिमित्त शपथ घेतली. पोलीस विभागाने वाहतूक आणि पोलीस बंदोबस्त पुरवून सहकार्य केले. संदीप इंगोले आणि अतुल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. त्रिवेणी बांते यांनी आभार मानले. खेलो इंडिया सेंटरच्या वतीने धनुर्विद्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त दि. २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान विविध क्रिडा स्पर्धा घेण्यात येणार आहे. यात खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी जिल्हा क्रिडा अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष विघ्ने, वैशाली इंगळे, स्वप्नील चांदेकर, राहुल निवडंगे, प्रफुल्ल डांगे, रितेश अनंतवार, धनंजय भारसाकडे, अकिल शेख, राजपाल इंगळे, अमोल लांडे यांनी पुढाकार घेतला.

# कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी एकत्रित घ्यावे का?




**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी हे दोन्ही घटक मजबूत, निरोगी हाडे टिकवण्यासाठी आवश्यक पोषकतत्त्वे आहेत. हाडांच्या आरोग्यात प्रत्येकाचे कार्य वेगळे असले, तरी हे दोन्ही एकत्र घेतल्यास जास्त चांगले परिणाम मिळतात.



कॅल्शियम हा एक खनिज घटक असून तो हाडांना रचना आणि मजबुती देतो, तर व्हिटॅमिन डी हे जीवनसत्त्व असून ते हाडांच्या वाढीस मदत करते. साधारणपणे प्रौढांना दररोज १,००० ते १,२०० मिलिग्रॅम कॅल्शियमची गरज असते, तर बहुतेक प्रौढांना दररोज ६०० ते ८०० आय.यू. व्हिटॅमिन डीची गरज असते. वय, त्वचेचा रंग किंवा काही आरोग्य स्थिती यांच्या आधारावर काहींना यापेक्षा अधिकही लागू शकते.

यासाठी दुग्धजन्य पदार्थ, पालेभाज्या, हाडांसह मासे (उदा. सार्डिन्स किंवा कॅनमध्ये मिळणारे सॅल्मन) असे कॅल्शियमयुक्त अन्न अधिक प्रमाणात घेणे आवश्यक ठरते. तसेच मासे, अंडी, मशरूम आणि फॉर्टिफाईड दूध हे व्हिटॅमिन डीयुक्त अन्न घेणेही महत्त्वाचे आहे. व्हिटॅमिन डी मिळवण्यासाठी अन्नाचे स्रोत मर्यादित असून त्यातही कमी प्रमाणातच हे जीवनसत्त्व असते. त्यामुळे लोकांना पुरेसे व्हिटॅमिन डी मिळावे म्हणून सप्लिमेंटस् घ्यावे लागतात.खरे पाहता सूर्यप्रकाश शरीराला नैसर्गिकरीत्या व्हिटॅमिन डी तयार करण्यास मदत करतो; मात्र खूप जास्त प्रखर सूर्यप्रकाश घेतल्यास त्वचारोगासारखे इतर आरोग्य धोके उद्भवू शकतात. सबब सकाळच्या कोवळ्या उन्हात अर्धा तास थांबा. सप्लिमेंट घेण्यापूर्वी लक्षात ठेवावे की, प्रौढांसाठी व्हिटॅमिन डीचे कमाल प्रमाण दररोज ४,००० आय.यू. आहे. व्हिटॅमिन डी हे चरबीत विरघळणारे असल्यामुळे ते शरीरात साठू शकते आणि वेळोवेळी वाढू शकते. कोणतेही नवीन सप्लिमेंट सुरू करण्यापूर्वी योग्य सल्ला घेणे आवश्यक आहे.

# सोयाबीन पिकावरील पाने खाणाऱ्या किडींचे व्यवस्थापन कसे कराल? वाचा सविस्तर

**दि.३० विदर्भ प्रजासत्ताक**

सोयाबीनचे पिक मध्यस्थितीत फुलोऱ्याच्या तसेच शेंगा लागण्याच्या अवस्थेत आहे. या अवस्थेत सोयाबीन पिक हिरवेगार, मऊ, लुसलुशीत आणि दाट पानांचे असल्यामुळे अनेक पाने खाणाऱ्या किडी या पिकाकडे आकर्षित होतात. त्यात प्रामुख्याने तंबाखूवरील पाने खाणारी अळी (स्पोडोप्टेरा), उंट अळी, पाने गुंडाळणारी अळी, केसाळ अळी व शेंगा पोखरणारी अळी (निकोव्हो वा पाने खाणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसुन येतो.

**कृषी विशेष**

**एकात्मिक कीड व्यवस्थापन**

**मशागतीसाठी उपाय**

पिकाच्या सुरवातीच्या अवस्थेत पिक तणमुक्त ठेवावे.

बांधावर असणाऱ्या किडीच्या पर्यायी यजमान वनस्पतीचा नाश करावा.

मुख्य पिकाभोवती एरंडी आणि सूर्यफूल या सापळा पिकाची एक ओळ लावावी. त्यावर तंबाखूवरील पाने खाणारी अळी, उंट अळी व केसाळ अळीने प्रादुर्भावग्रस्त पाने आढळल्यास अशी पाने अळयांसहित नष्ट करावीत.

उशिरा पेरणी केल्यास या किडीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आदळून येण्याची शक्यता असते.

**यांत्रिक उपाय** शेतात अगदी सुरवातीला किड व रोगग्रस्त झाडे दिसताच उपटुन नष्ट करावीत.

तंबाखूवरील पाने खाणारी अळी व केसाळ अळी एकाच पानावर कुंजक्याने अंडी घालते. त्यातुन बाहेर पडणाऱ्या अळ्या सुरवातीला एकाच पानावर बहुसंख्य असतात.

अशी अंडी व अळीग्रस्त पाने अलगद तावुन किडींसह नष्ट करावीत. शेंगा पोखरणारी अळी व तंबाखूवरील पाने खाणारी अळी या किडीच्या प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी एका हेक्टरवर प्रत्येकी पाच कामगंध सापळे लावावेत.

जैविक उपाय

सुरवातीस निंबोळी अर्क (५ टक्के) किंवा अझाडिरॅक्टिन १००० पीपीएम २० ते ३० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

मेंटारालम रीलाई व विव्हरिया बॅंमियाना (१.१५ विद्राव्य पावडर) या बुरशीजन्य जैविक किटकनाशकाची ५० पैम प्रति १० लिटर सुरवातीला पाण्यात मिसळून फवारणी करावी.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
शाडू मातीच्या आकर्षक गणेश मूर्ति विक्रीसाठी उपलब्ध
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

जॅसिलम थुरीजेन्सीस प्रजाती कुर्ताकी या विषाणूजन्य जैविक किटकनाशकाची १०-१५ ग्रॅम / मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

तंबाखूवरील पाने खाणारी अळी (म्पोडोप्टेरा) व शेंगा पोखरणारी अळी (हेलिकोवर्पा) ... किटकनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिमळून फवारणी करावी.

**रासायनिक उपाय**

पाने खाणाऱ्या किडींची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावी. दूसरी फवारणी १० ते १५ दिवसांच्या अंतराने करावी एकच किटकनाशक न वापरता ते आलटून पालटून वापरावे.

**– विशाल चौधरी, विषय विशेषज्ञ, पिकसंरक्षण कृषि विज्ञान केंद्र, मालेगाव.**

# मुसळधार पावसामुळे अनेक रेल्वेगाड्या रद्द, मार्गात बदल नरखेड-काचिगुडा एक्स्प्रेसलाही फटका



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती –** दक्षिण मध्य रेल्वेच्या हैदराबाद विभागातील भिकनूर-तळमडला-अक्कनपेट या सेक्शनमध्ये काही ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने या मार्गावरून धावणाऱ्या अनेक रेल्वेगाड्यांना फटका बसला असून ३० ऑगस्टला नरखेडवरून सुटणारी १७६४२ नरखेड-काचिगुडा एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे. याशिवाय २९ ऑगस्टला धावणारी १७६४१ काचिगुडा नरखेड ही एक्स्प्रेस देखील रद्द करण्यात आली आहे. ०७१८९ नांदेड-धर्मावरम, ३१ ऑगस्टला ०७१९० धर्मावरम-नांदेड, २९ ऑगस्टला ७७६०५ काचिगुडा-पूर्णा या एक्स्प्रेस देखील रद्द करण्यात आल्या आहेत. २८ ऑगस्टला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सुटलेली मुंबई-लिगमपल्ली एक्स्प्रेस ही निजामाबाद-आरमूर-करीमनगर-पेडापल्ली बायपास-काझीपेट या बदललेल्या मार्गावरून धावत आहे. कामारेड्डी, अकानापेट, मिर्झापल्ली, बोलाराम हे थांबे वगळण्यात आले आहेत.

# घरोघरीच्या व सार्वजनिक मंडळांच्या बाप्पांची छायाचित्रे अपलोड करण्यास शासनाच्या वतीने पोर्टलची निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३० अमरावती.**

महाराष्ट्रातील गणेशोत्सवास राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. या राज्योउत्सवांतर्गत घरोघरीच्या बाप्पांचे व सार्वजनिक मंडळाच्या बाप्पांची छायाचित्रे अपलोड करणे, प्रसिद्ध मंडळे व मंदिरातील गणपतींचे थेट दर्शन मिळावे याकरीता पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्यावतीने https://ganes hotsav.p ldmka.co.in या पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.

या पोर्टलवर आपण आपल्या घरच्या गणपती बाप्पांचे व सार्वजनिक मंडळातील बाप्पांचे छायाचित्र अपलोड करू शकता. तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिरे व सार्वजनिक मंडळातील बाप्पांचे थेट दर्शन घेण्याची सोय देखील या पोर्टल द्वारे करण्यात आली आहे. या संधीचा लाभ अधिकाधिक गणेशभक्तांनी घ्यावा असे आव्हान सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी केले आहे.–





## सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण



# प्राधान्य क्षेत्र ठरवून जिल्हा नियोजनमधून कामे करणार -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती** जिल्हा विकास व नियोजन समितीच्या निधीमधून प्रामुख्याने स्थानिकस्तरावरील कामे करण्यात येतात. यावर्षी प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सुरक्षा ही प्राधान्य क्षेत्र ठरवून जिल्हा नियोजनमधून कामे करण्यात येतील, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

जिल्हा नियोजन सभागृहात आज जिल्हा नियोजन व विकास निधीबाबत बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, बळवंत वानखेडे, अमर काळे, आमदार धीरज लिंगाडे, संजय खोडके, उमेश यावलकर, प्रविण तायडे, राजेश वानखेडे, केवलराम काळे, प्रताप अडसड, सुलभा खोडके, गजानन लवटे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा, जिल्हा अधीक्षक पोलिस अधिकारी विशाल आनंद, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, विकसित भारताचे ध्येय ठरविण्यात आले आहे. त्यानुसार जिल्ह्याच्या विकासाचे ध्येय आणि त्यानुसार जिल्ह्यात कामे करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना दौरा करून त्यांचे विकासाचे व्हीजन जाणून घेण्यात येणार आहे. यातून जिल्हा नियोजनमधून करणाऱ्या कामांचे नियोजन करण्यात येणार आहे. या निधीतून करण्यात येणारी कामे उत्कृष्ट दर्जाची असावीत, यात हयगय केल्यास कारवाई करण्यात येणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीनिमित्त गौरव अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच जिल्हा नियोजनचा १ टक्के निधी वृक्षलागवडीसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मेळघाटातील आरोग्याचा प्रश्न हाताळण्यासाठी मेळघाट आरोग्य परिक्रमा राबविण्यात येणार आहे. यातून जिल्हाभरातील तज्ज्ञ डॉक्टरांचे शिबीर आयोजित करून उपचार करण्यात येतील. सुपर स्पेशालिटीमध्ये आयसीयू, रक्तपेढी, रेडीयेशन सेंटर उभारण्याबाबत लक्ष देण्यात येणार आहे.

मनपा आणि जिल्हा परिषदेच्या शाळांना चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी निधी उपलब्ध करण्यात येतील. त्यासोबतच शाळांमध्ये वर्गखोल्या स्मार्ट होण्यासाठीही मदत करण्यात येतील. नागरिकांच्या सुरक्षेसाठी नगरपालिका क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील. यासाठी गृह विभागाच्या मार्वल कंपनीसोबत करार करण्यात येणार आहे. सर्वांसाठी घरे उपलब्ध करण्यात येणार आहे. आवास योजनेतून १ लाख घरे बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी नागरिकांना पट्टेवाटप, गुंठेवारी कायद्यातून अनधिकृत ले आऊट नियमानुकूल करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच सर्वांना मालमत्ता कार्ड देण्यात येणार आहे.

## वितरीत निधी अखर्चित राहिल्यास कारवाई

### नगरपालिका सीसीटीव्ही निगराणीखाली आणणार

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न समोर आला आहे. प्रामुख्याने एमडी ड्रग्जची विक्री तसेच त्यामुळे शहरात वाढलेली गुन्हेगारी यामुळे संपूर्ण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलण्याच्या सुचना करण्यात आल्या. हॉटेलांना देण्यात आलेल्या परवान्यानुसार वेळ पाळण्यात यावी. परवान्याचे उल्लंघन होत असल्यास २४ तासाच्या आत परवाना रद्द करण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.

शहरातील रेल्वे पुलासंदर्भात तातडीने पावले उचलण्यात येणार आहे. यासाठी रेल्वेमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे. याबाबत नवीन उपाययोजना करण्यासंदर्भातही माहिती घेण्यात आली. पुलाची दुरूस्ती करून हलकी वाहने आणि पादचारी यांच्यासाठी हा मार्ग खुला करण्याची शक्यता पाहण्याच्याही सूचना करण्यात आल्या. चिखलदऱ्यातील आकर्षण ठरणारा स्कायवॉक येत्या एप्रिलपर्यंत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच चिखलदरा महोत्सवासह चार इको टुरिझम स्पॉट निवडण्यात येणार आहे. यासाठी निधी उपलब्ध करून चिखलदऱ्यातील पर्यटकांचा ओढा वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना त्यांच्या मागणीनुसार निधी देण्यात येणार आहे. येत्या १५ सप्टेंबरपर्यंत प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे. तसेच ३० सप्टेंबरपर्यंत जिल्हा नियोजनचा संपूर्ण खर्च करावा लागणार आहे. निधी खर्च झाला नसल्यास संबंधित यंत्रणा प्रमुखांवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच दिलेला निधी परत घेऊन पुनर्विनियोजनाद्वारे इतर यंत्रणांना निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे यंत्रणांनी दक्ष राहून हा निधी प्राधान्याने खर्च होण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी दिले.

# गांजा विक्री करणाऱ्याला तीन वर्ष सश्रम कारावासाची ठोठावली शिक्षा



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.३०अमरावती-** गांजा विक्री प्रकरणात एका आरोपीस येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने शुक्रवारी तीन वर्षे सश्रम कारावास व २५ हजार रुपये दंड. दंड न भरल्यास सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

विधी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन भीमराव उमेकर (६५, रा. रेवसा, अमरावती) असे शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. गजानन उमेकर हा राहत्या घरी अवैधरीत्या गांजा विक्री करत असल्याची माहिती वलगाव पोलिसांना मिळाली. त्या आधारावर वलगावचे तत्कालीन पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात पोलिसांनी ३ मे २०२० रोजी दुपारी एक वाजता गजानन उमेकरच्या घरी धाड टाकली.

या कारवाईत गजानन उमेकरच्या घरातून पोलिसांनी ११०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या तक्रारीवरून गजानन उमेकरविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. तपासाअंती दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणात न्यायाधीश आर. जी. वाघमारे यांच्या न्यायालयात सात साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली. साक्षीदारांची साक्ष व सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने गजानन उमेकरला तीन वर्षे सश्रम कारावास, २५ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. आहे. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील गजानन खिल्लारे व मंगेश भागवत यांनी युक्तिवाद केला आहे.

# महसूल मंत्री बावनकुळेंसमोर जेंव्हा सत्तारूढ आमदार नाराजी व्यक्त करतात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-** राज्याचे महसूल मंत्री आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या आमदार सुलभा खोडके यांनी गेल्या सभेत मांडलेले मुद्दे इतिवृत्तात समाविष्ट करण्यात न आल्याने पालकमंत्र्यांसमोर नाराजी व्यक्त केली. आमदारांनी मांडलेले मुद्दे जर इतिवृत्तात घेतले जात नसतील, तर आमच्या बोलण्याला अर्थ काय? अशा शब्दात सुलभा खोडके यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या.

सुलभा खोडके म्हणाल्या, जिल्हा नियोजन समितीमार्फत अमरावती महापालिकेला आधी १२ कोटी निधी मिळत होता. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकांमध्ये तत्कालीन वित्तमंत्र्यांकडे वारंवार मागणी केल्यानंतर मागील तीन वर्षात जिल्हा नियोजनात ३५ कोटी व वर्ष २०२५-२६ च्या नियोजनात अमरावती महापालिकेसाठी ६२ कोटींची नियतव्ये वाढवून तशी तरतूद करण्यात आली आहे.

परंतु, अमरावती शहराची लोकसंख्या जवळपास १० लाखांवर गेली आहे. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता विकासकामांचे नियोजन करतांना निधी अपुरा असल्याने मूलभूत सुविधांकरिता निधीची मोठी अडचण जात आहे. म्हणून जिल्हा नियोजनातून महापालिकेसाठी १०० कोटींचा निधीचा आराखडा मंजूर करण्यात यावा.

विभागीय क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा वार्षिक नियोजनामध्ये नवीन लेखाशीर्ष निर्माण करून ५ कोटी रुपयांची तरतूद करण्याची मागणी त्यांनी केली. जिल्हा क्रीडा संकुल व विभागीय क्रीडा संकुल येथे सेवा सुविधांसाठी शासनाच्या वतीने निधी मिळतो, परंतु देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नाही. या मुद्याकडे सुद्धा खोडके यांनी समितीचे लक्ष वेधले.

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या किरकोळ दुरुस्ती व देखभालीसाठी सुद्धा निधी वितरित करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत तरतूद करण्यात यावी, अमरावती मधील शासकीय शैक्षणिक संस्थांच्या इमारती या ५० ते ६० वर्ष जुन्या असल्याने त्या जीर्ण होत आहे. त्यामुळे शासकीय तंत्रनिकेतन व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी जिल्हा नियोजनातून भरीव निधी उपलब्ध व्हावा, अशी मागणी खोडके यांनी यावेळी केली.

## अखेर जुना धामणगावात ऐतिहासिक निर्णय

# हद्दवाढीचा प्रस्ताव ग्रापं. सभेत एकमताने मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धा.रेल्वे -** धामणगाव तालुक्यातील जुना धामणगाव येथे गेल्या अनेक दशकांपासून रखडलेला व वादग्रस्त आणि चर्चेत राहिलेला हद्दवाढीचा ठराव अखेर शुक्रवार २९ ऑगस्टला ग्रामपंचायतीच्या सभागृहात मंजूर करण्यात आला. या ठरावाच्या मंजुरीनंतर शहरालगतचा कॉलनीतील नागरिकांना दिलासा मिळाला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान हा दिवस ऐतिहासिक ठरल्याची भावना कॉलनीवासियांना तर्फे व्यक्त होत आहे. धामणगाव नगर परिषदेच्या हद्दीत आता जुना धामणगावातील ६२ कॉलनीचा अंतर्भाव होणार आहे. हद्दवाढीचा ठराव हा कॉलनीत राहणाऱ्या नागरिकांचा प्रतिष्ठेचा प्रश्न मानला जात होता. अनेक वर्षांपासून या ठरावावर चर्चा झाली, परंतु तो कायम रखडत राहिला. वेळोवेळी यावरून गावात वाद निर्माण झाले, राजकीय नेत्यांमध्ये मतभेद झाले. या उरावामुळे कोलोनी मधे राहणाऱ्या नागिराकांचे विकासाचे अनेक प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा कॉलनी वासियांकडून होती, मात्र विविध कारणांमुळे ठराव वारंवार मागे ढकलला जात होता. परंतु शुक्रवारला (ता. २९) ग्रामपंचायतीच्या सभागृहात मंजूर करण्यात आला. या ठरावाच्या मंजुरीनंतर शहरालगतचा कॉलनीतील नागरिकांना दिलासा मिळाला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. दरम्यान हा दिवस ऐतिहासिक ठरल्याची भावना कॉलनीवासियांना तर्फे व्यक्त होत आहे. धामणगाव नगर परिषदेच्या हद्दीत आता जुना धामणगावातील ६५ कॉलनीचा अंतर्भाव होणार आहे.

> ठराव मंजूर झाल्याचे वृत्त गावात पसरताच नागरिकांनी उत्स्फूर्त आनंद व्यक्त केला. फटाके फोडून, मिठाई वाटप करून लोकांनी आपला आनंद साजरा केला. अनेक जणांनी हा क्षण कॉलोनीयां मधे राहणाऱ्यासाठी ऐतिहासिक असल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, ज्येष्ठ नागरिकांनीही वर्षानुवर्षे वाट पाहिलेला निर्णय अखेर प्रत्यक्षात आला याबद्दल समाधान व्यक्त केले.

# उद्या जोरदार पावसाची शक्यता

## ३१ ऑगस्टपासून पाऊस ओसरणार

### बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती-** बंगालच्या उपसागरावर तसेच छत्तीसगड भागात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. सोबतच बाष्पयुक्त वारे वाहत असल्यामुळे अमरावती जिल्ह्यात २९ व ३० ऑगस्टला सर्वदूर पावसाची दाट शक्यता आहे. याचदरम्यान जिल्ह्यातील काही ठिकाणी अतिजोरदार पाऊस होण्याची शक्यता असून जिल्ह्यात या दोन्ही दिवशी 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे, अशी माहिती प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूरच्या तज्ज्ञांनी दिली आहे.

> अमरावती जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी २९ व ३० ऑगस्टला पाऊस कोसळणार आहे. त्यापैकी काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. त्यामुळेच जिल्ह्याला 'ऑरेंज अलर्ट'चा इशारा दिला आहे. ३१ ऑगस्टपासून मात्र पाऊस कमी होईल.
> **-डॉ. प्रवीणकुमार,** वरिष्ठ शास्त्रज्ञ, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर.

ऑगस्ट महिन्यात जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाला आहे. या पावसामुळेच अनेक जलाशय तुडुंब भरले असून, जिल्ह्यातील सर्वात मोठ्या नल दमयंती धरणाचे तीन दरवाजे गुरुवारी (दि. २८) उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. यासोबतच इतर जलसाठ्यांतूनही पाणी सोडण्यात आले. समाधानकारक पावसामुळे पिकांची स्थिती चांगली आहे. मात्र ऑगस्टमध्येच काही ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे तसेच घरांचेही नुकसान झाले. दरम्यान मागील पाच ते सहा दिवसांपासून पावसाचे प्रमाण कमी झाले. मात्र पुन्हा एकदा २९ व ३० ऑगस्टला जिल्ह्यात सर्वदूर पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीची नोंद होऊ शकते. पावसासोबतच वादळ आणि विजांचा कडकडाटही होणार आहे. २८ ऑगस्टपासूनच वातावरणात झालेले हे बदल पाहायला मिळत आहे.



३१ ऑगस्टपासून मात्र पावसाचे प्रमाण कमी होणार असून थोडी फार हवा राहणार आहे. पाऊस बंद झाल्याने मात्र ढगाळ वातावरण व आर्द्रता वाढल्याने दमट वातावरण राहणार आहे, त्यामुळे काही प्रमाणात उकाडा वाढू शकतो, असाही अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे.


# कौन बनेगा करोडपतीमध्ये गूंजला श्री हनुमान व्यायाम मंडळाचा जयघोष

## अमरावतीत उत्साहाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
सिनेजगतातील महानायक अमिताभ बच्चन यांच्या भारदस्त आवाजात प्रसारित होणाऱ्या 'कौन बनेगा करोडपती' (केबीसी) या लोकप्रिय कार्यक्रमाने गुरुवारी (ता.२८) अमरावतीचा गौरव वाढवला. ७ लाख ५० हजार रुपयांच्या प्रश्नात अमिताभयांनी विचारले, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने ऑलिंपिक स्पर्धेत कोणत्या शहरात कबड्डी खेळाचे प्रदर्शन केले? या प्रश्नाने मंडळाची ऐतिहासिक उपलब्धी पुन्हा चर्चेत आली. केबीसीच्या मंचावर मंडळाचा उल्लेख होताच अमरावतीत उत्साहाचे वातावरण पसरले.

'कौन बनेगा करोडपती' ही स्पर्धात्मक मालिका अनेक वर्षांपासून खासगी वाहिनीवर लोकप्रिय आहे. यात १६ प्रश्नांची अचूक उत्तरे देऊन ७कोटी रुपये जिंकता येतात. देशभरातील लाखो नागरिक या कार्यक्रमात सहभागी होण्याचा प्रयत्न करतात.

२८ ऑगस्ट रोजी अमिताभ बच्चन यांनी मांडलेल्या प्रश्नात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा उल्लेख अमरावतीकरांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. अनेकांनी मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके आणि सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांच्याशी संपर्क साधून १९३६ च्या बर्लिन ऑलिंपिकबद्दल माहिती जाणून घेतली.




१९३६ मध्ये जर्मनीतीलपर्क साधन आयोजित ऑलिंपिक स्पर्धेत मंडळाचे संस्थापक अंबादासपंत वैद्य यांनी डॉ. सिद्धनाथ काणे आणि डॉ. लक्ष्मणराव कोकडेकर यांच्या नेतृत्वाखाली २५० खेळाडूंची चमू पाठवली होती. या चमूने कबड्डी आणि खो-खो या भारतीय पारंपरिक खेळांचे उत्कृष्ट प्रदर्शन करून जगाला आश्चर्यचकित केले.

मंडळाला दोन पदके मिळाली होती. ऑलिंपिक समितीचे पदाधिकारी आणि जागतिक व्यायामतज्ज्ञ कार्ल डिम यांनी मंडळाला विशेष निमंत्रण दिले होते. या प्रदर्शनाने जगाला प्रथमच कबड्डी आणि खो-खो खेळांची ओळख झाली, ज्यामुळे भारतीय खेळांचा गौरव वाढला.

१९३६ च्या बर्लिन ऑलिंपिकमध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने कबड्डी आणि खो-खो खेळांचे प्रदर्शन करून जगाचे लक्ष भारतीय खेळांकडे वेधले, हा अमरावतीकरांसाठी अभिमानाचा क्षण होता.

> **श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला मिळाली दोन पदके**
> बर्लिन ऑलिंपिकमध्ये मंडळाच्या २५० खेळाडूंनी भारतीय पारंपरिक खेळांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. जगभरातील खेळाडू आणि प्रेक्षकांनी या खेळांचे कौतुक केले आणि मंडळाला विशेष पदक प्रदान करण्यात आले.

# जनतेचे प्रश्न अनुत्तरित

## युकाँच्या निर्दशनांकडे पालकमंत्र्यांचे दुर्लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**
सार्वजनिक बांधकाम विभागाने रेल्वेपूल वाहतुकीसाठी अचानक बंद केल्याने शहरातील १० लाख नागरीकांना ऐन हिंदु उत्सवाच्या वेळेस वेठीस धरण्यात आले, असे सांगत या संदर्भात पालकमंत्र्यांना निवेदन देण्यासाठी युवक काँग्रेसचे कार्यकर्ते चार तास थांबले. मात्र पालकमंत्री राजकमल चौकाकडे फिरकलेच नाही. ऐनवेळी त्यांनी महापालिकेतील बैठक सुद्धा रद्द केली. त्यामुळे युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राजकमल चौकात पालकमंत्र्यांच्या विरोधात नारेबाजी केली.जिल्हा नियोजन समितीची बैठक घेण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवारी अमरावतीत होते. यावेळी त्यांनी दुपारी चार वाजता महानगरपालिकेत सुद्धा बैठक नियोजित केली. त्यामुळे रेल्वेपुलासंदर्भात नागरिकांना होत असलेल्यासमस्याबाबत निवेदन देण्याकरिता युवक काँग्रेसचे कार्यकर्ते दुपारी तीन वाजतापासून उभे होते. परंतु पालकमंत्री महापालिकेकडे तर फिरकलेच नाही उलट त्यांनी महापालिकेची बैठकही रद्द केली. परिणामतः युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना पालकमंत्र्यांना जनतेच्या समस्येबाबत अवगत करता आले नाही. पोलीस व सार्वजनिक विभागानेरुग्ण वाहिका चालक संघटना, व्यापारी संघटना, शिक्षण संस्था, ऑटो युनीयन संघटना, एस.टी. महामंडळ व इतर संघटनाना विश्वासात व कोणतेही माहिती न देता राजकमल ते रेल्वेस्थानक हा रेल्वेपूल वाहतुकीसाठी बंद केला. त्याचा अमरावती शहराच्या वाहतूक व्यवस्थेवर याबाबत पालकमंत्री तसेच जनप्रतीनिधी यांनी जनतेला कोणतेही माहिती किंवा सुचना दिलेली नाही. परतू सत्ताधारी भाजपाने व मित्र पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी या प्रकरणाची कोणतेही दखल घेतली नाही. किवा याबाबत कोणताही पाठपुरावा केलेला नाही.

यावेळी माजी नगरसेवक मुन्ना राठोड, वैभव देशमुख अध्यक्ष शहर युवक काँग्रेस, समिर जवंजाळ, अनिकेत डेंगळे, सागर कलाने, आशिष यादव, संकेत साहू, शुभम बांबल, श्रेयस धर्माळे, धनंजय बोबडे, मोहित भेंडे, जितेंद्र भैसे, निलेश देशमुख, कुणाल गावंडे, आकाश गेडाम, चैतन्य गायकवाड, आकाश धुराटकर, संकेत भेंडे, कौस्तुभ देशमुख, शिवानंद भोंगाडे, अभिषेक भोसले, साहित्य वानरे, क्रिश बिसने यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# गणेशोत्सवामुळे ईद-ए-मिलादची मिरवणूक तीन दिवस पुढे

## अकोल्यात हिंदू-मुस्लिम एकात्मतेचा अनोखा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अकोला–** गणपती विसर्जन मिरवणूक व ईद ए मिलादनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकांच्या निमित्ताने शहरात हिंदू - मुस्लिम एकात्मतेचा अनोखा संदेश देण्यात आला आहे.शहरात सौहार्द व सामाजिक एकोप्याला प्राधान्य देत गणेशोत्सवामुळे ईद ए मिलादची मिरवणूक तीन दिवस पुढे काढण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. दोन्ही समाजाकडून एकमेकांच्या पारंपरिक मिरवणुकीचे स्वागत केले जाणार आहे, अशी माहिती मुस्लिम समाजाच्यावतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

अत्यंत संवेदनशील म्हणून अकोला शहर ओळखले जाते. शहराला हिंसक दंगलीची पार्श्वभूमी आहे. मात्र, आता शहराची ओळख बदलत आहे. सध्या गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. ६ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी असून या दिवशी शहरातून गणपती विसर्जन मिरवणूक काढण्याची मोठी परंपरा आहे.

मुस्लिम समाजाचा ईद ए मिलाद ५ सप्टेंबर रोजी आहे. या



सणानिमित्त मुस्लिम समाजाकडून देखील शहरातून मिरवणूक काढली जाते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजाने आपली मिरवणूक पुढे ढकलून ९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ताजनापेठ कच्छी मशिदीसमोरून पारंपरिक मार्गाने काढण्याचा निर्णय घेतला. सलग तिसऱ्या वर्षी मुस्लिम समाजाने हा निर्णय घेऊन हिंदू - मुस्लिम एकतेचा आदर्श घालून दिला.'रबी उल अव्वल' महिन्याच्या १२ व्या दिवशी ईद ए मिलाद साजरा केला जातो. या दिवशी मुस्लिम समाजाकडून विविध सेवाभावी उपक्रम राबवले जातात, अशी माहितीही समितीकडून देण्यात आली.

यावेळी आमदार साजिद खान पठाण, ईद मिरवणूक कमिटीचे अध्यक्ष हाजी मुदाम खान, सार्वजनिक गणपती विसर्जन मिरवणूक समितीचे अध्यक्ष ड. मोतीसिंग मोहता, सचिव ड. एस. एस. ठाकुर, कच्छी मशिद ट्रस्टचे अध्यक्ष जावेद जकरिया, शेख सलीम सदर गोरवे आदींसह मिरवणूक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### हिंदू-मुस्लिम समाज पदाधिकाऱ्यांचा सत्कार करणार

गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये ताजनापेठ येथे मुस्लिम समाजाकडून गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला जाणार आहे, तर गांधी चौकात गणेशोत्सव मंडळाकडून ईद ए मिलादच्या मिरवणूक समितीचा सत्कार करण्यात येईल.

# कृषी महाविद्यालयात गणेशोत्सवात पर्यावरण पूरक देखावा

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, गणेशाची स्थापना करून राज्य महोत्सवास सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अकोला–** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्णयानुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठअंतर्गत कृषि महाविद्यालयात गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणूर साजरा करण्यात येत आहे. बाप्पांच्या मिरवणुकीत विद्यार्थी-विद्यार्थ नि सहभागी झाल्या. गणेशोत्सवात पर्यावरण पूरक



देखावा साकारण्यात आला आहे. गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणपतीची भव्य मिरवणूक काढून ढोल-ताशे आणि लेझीम खेळत गणेश मूर्ती वाजत गाजत मंडपात विराजमान केली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते गणेशमूर्तीची स्थापना करून राज्य महोत्सवाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर, कुलगुरूंचे तांत्रिक सचिव डॉ. नितीन कोष्टी यांचे सह महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, बहुसंख्येने उपस्थित होते.

# गोसावी नंदन गणपती उत्सवाला ४०० वर्षांची परंपरा

## राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा काळ १६ व्या शतकापासून सिंदखेडराजा येथे गणेशोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती–** शेंदूर लाल चढायो, अच्छा गजमुख को दोंदिल लाल बिरजे, सूत गौरी हर को... या प्रचलित आरतीचे रचयीता गोसावी नंदन स्वामी यांनी सुरू केलेली गणेशोत्सवाची परंपरा चारशे वर्षांपासून अखंडितपणे येथील श्री गोसावी नंदन गणपती संस्थानमध्ये आज ही सुरू आहे. काळ्या मातीची पर्यावरणपूरक गणेश मूर्ती येथे दरवर्षी स्थानिक मूर्तिकार तयार करतात. १० दिवस उत्सव व ११ व्या दिवशी विसर्जन असे या उत्सवाचे स्वरूप आहे. अशी आख्यायिका आहे. गोसावी नंदन यांचे मूळ नाव वासुदेव, ते मूळचे बीड येथील असून श्री गणेशाची घरातूनच मिळालेली भक्ती आणि पुढे त्यांनी गणपतीची उपासना म्हणून त्यांनी लिहिलेला ज्ञान मोदक ग्रंथ आजही वाचला जातो. वासुदेव यांनी पुणे येथील मोरया गोसावी (चिंचवड संस्थान) यांचे शिष्यत्व पत्करले. श्री गणेशाची आराधना हेच आयुष्य असलेल्या वासुदेव यांचे गोसावी नंदन हे नाव रूढ झाले. काळी माती, गवत, जवस,



ताग आणि नैसर्गिक रंगांपासून येथे दरवर्षी गणेशाची मयुरारुढ मूर्ती तयार केली जाते. स्थानिक मूर्तिकार परंपरेने ही मूर्ती तयार करतात. ही मूर्ती तयार करण्याची देखील परंपरा आहे. गोकुळाष्टमी पूर्वी राहेरी येथून पूर्णा नदीची पवित्र माती मंदिरात आणली जाते. कुंभार बांधवांकडून माती शास्त्रशुद्ध पद्धतीने रांधून घेतली जाते. अशा या पुरातन गणेश मंदिरात रोज रात्री ७ वाजता महाआरतीसाठी भाविक मोठ्या प्रमाणात हजर असतात. आता या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम चालू आहे. या ठिकाणी २० फूट उंच कलश तयार केला जातो आहे.

मूर्तिकारांची नवीन पिढी पूर्वी संस्थांचे अध्यक्ष दिवंगत शरदराव मुळे,निंबाळकर, त्रिंबक गुरु पाठक हे मूर्ती तयार करायचे. आता ही परंपरा नव्या पिढीतील कलाकार गजानन सोनुने, शाम मुळे, गजानन मेहेत्रे, अनिकेत खरात व १० वर्षांचा समर्थ सोनुने हे या मूर्ती कार्यात अग्रेसर आहेत.

मोरावर आरुढ आकर्षक अन् मनमोहक मूर्ती मूर्ती ही काळी माती, गवत, जवस, ताग आणि नैसर्गिक रंगांपासून बनवलेली असल्याने खूपच मनमोहक बनवल्या जाते. या मूर्तीला उस्तव मूर्ती असे म्हणतात. मोरावर बसलेली आकर्षक व मनमोहक मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेते.

# विद्याविहार विद्यालयात शाडू मातीपासून

## पर्यावरणपूरक गणपती बनविण्याची स्पर्धा उत्साहात पार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०तळेगाव ठाकूर –** विद्यार्थ्यांच्या केवळ शैक्षणिक नव्हे तर सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी विद्याविहार विद्यालयात शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेश मूर्ती बनविण्याची अनोखी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. हा उपक्रम श्री संत गजानन महाराज बहुउद्देशीय संस्था, मूर्तिजापूर यांच्या सौजन्याने आणि मस्तराम बाबा शिक्षण संस्था यांच्या प्रेरणेतून आयोजित करण्यात आला.

विद्यार्थ्यांना शाडू माती पुरविण्यात आली होती. त्यांनी आपल्या हस्तकौशल्याचा वापर करून विविध प्रकारच्या सुंदर, आकर्षक आणि सृजनशील गणेश मूर्ती घडवल्या. नैसर्गिक रंग, फुले व पाने यांचा वापर करून मूर्तींचे पर्यावरणपूरक सजावट करण्यात आली होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. रोहन पिंपळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख उपस्थितीत आमदार हरीश पिंपळे, संस्थापक अध्यक्ष सुनील लछवानी, उपाध्यक्ष सौ. नूतनताई पिंपळे, कोषाध्यक्ष प्रशांत हजारी, संचालक योगेश पूरसुले, सचिव भैय्यासाहेब ठाकूर, शाळेचे मुख्याध्यापक अनिल भारती सर आदी मान्यवर उपस्थित होते.डॉ. पिंपळे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षण आणि पारंपरिक कलेचा संगम साधण्याचे महत्त्व समजावून सांगितले. स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्रे व आकर्षक बक्षिसे देण्यात आली. स्पर्धेनंतर स्पर्धकांनी तयार केलेल्या मूर्तींचे पूजन करून दीड दिवसीय गणपती बसविण्यात आला. गणेशोत्सवाचे विसर्जनही भव्य आणि साजऱ्या पद्धतीने पार पडले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शरद पवार सर, प्रीती मोहोड मॅडम, रविराज खरोडे सर, ऋत्विक पांडव सर, कौशल गोंडचर सर, गजानन शितळे, श्रावणभाऊ बनकर यांचे विशेष योगदान लाभले.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देणारा हा स्तुत्य उपक्रम पालक व नागरिकांमध्ये समाधान आणि कौतुकाची भावना निर्माण करणारा ठरला आहे.

# अमरावतीत वाळूचा तुटवडा

## झिरो रॉयल्टीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०अमरावती**
जिल्ह्यात बाळूचा तुटवडा लक्षात घेता बरुड मोशी मार्गान होणारी बाळू वाहतूकीकरिता झिरो रॉयल्टी देण्यात यावी, या मागणीचे निवेदन महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवारी (ता. २९) देण्यात आले. उपाययोजना न यांना केल्यास जिल्ह्यातील बांधकाम क्षेत्रासह वाहतूक व्यवसाय पूर्णपणे ठप्प होईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. जिल्ह्यात वाळूचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्यामुळे बांधकाम व्यवसाय व मजूर वर्गावर गंभीर परिणाम झाला आहे. वाहनधारकांचे ईएमआय थकलेआहे. त्यामुळे असून उदरनिर्वाहावर संकट ओढावले मध्यप्रदेशातून वरुड-मोर्शी मार्गे होणाऱ्या वाळू वाहतुकीसाठी झिरो रॉयल्टी उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी वाळू वाहतूकदारांनी निवेदनातून केली आहे.जिल्ह्यात वाळूच्या उपलब्धतेवर अनेक बांधकामे अवलंबून आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात वाळूचा पुरवठा अत्यल्प प्रमाणात होत असल्यामुळे अनेक कामे ठप्प झाली आहेत.मजूर वर्ग हातावर पोट असलेला असल्याने त्यांच्या रोजगारावर परिणाम झाला आहे. झिरो रॉयल्टी उपलब्ध न झाल्याने जिल्ह्यातील सर्व वाहने बंद पडलीआहेत. वाहनधारकांना मासिक ईएमआय भरणे अशक्य झाले आहे. त्यामुळे आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. आम्ही वाहतूकदार आहोत, वाळू माफिया नाही, निवेदन देताना करीम लालू वाले, सचिन भोपले मिलिंद जवंजाळ निलेश सुरडकर, अहमद शेख इमरान, पवन चव्हाण, अभिषेक मोरे, शिवा खवल, समीर जिलानी, नवीभाई, अजय ढवळे, निखिल घोरमाडे, अजय शेळके, निकेश जवंजाळ, लक्ष्मण पाठक, श्रेयस रहाटे, प्रफुल गंजणे, विजय देशमुख, आकाश देहंकर, रणजित यांच्यासह ठाकरे, अविनाश खत्री, रणजीत भोकसे, वाहतूकदार उपस्थित होते.

# दारव्हा बस स्थानकात तलावसदृश परिस्थिती

## मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०दारव्हा–** शहरात गुरुवारी दि. २८ ऑगस्ट रोजी रात्रीपासून पावसाने हजेरी लावली. परंतु, शुक्रवारी दि. २९ ऑगस्ट रोजीचे सकाळी सात ते दहा या तीन तासाच्या पावसाने शहराची दाणादाण उडाली. त्यामुळे बस स्थानकाला तलावाचे स्वरुप आले. यामुळे बसमधून चढ-उतर करताना प्रवाशांना तलावातून पोहत जावे की, मार्गक्रमण करावे? असा प्रश्न निर्माण झाला होता. दारव्हा शहरातील बस स्थानक हे शहराच्या मध्यभागी आहे. यवतमाळ रस्त्यावर



असल्याने बसस्थानकात वर्दळ कायम असते. बस स्थानकाचे प्रस्तावित बांधकाम सुरु असल्यामुळे बस स्थानकातील पाण्याचा निचरा होत नाही. बसस्थानकात शुक्रवारी दुपारपर्यंत तळे साचले होते. चालकाला रस्ता दिसत नसल्यामुळे बस स्थानकातील चिखलात बसही फसली होती. यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. तीन दिवसापूर्वीच बस स्थानकात बसच्या मागील चाकात आल्याने भांडेगाव येथील एका वृद्धाचा मृत्यू झाला होता. ही घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा जोरदार पावसामुळे दारव्हा आगारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

प्रशासनाने गांभीर्याने घ्यावे दारव्हा शहरातील महावीर नगरच्या बाजूला असलेल्या छोट्याशा नाल्यात प्रचंड प्रमाणात गाळ अटकल्यामुळे काही घरात पाणी शिरले. त्या नगरमधील माझ्याही संपूर्ण घरात भरपूर प्रमाणात पाणी शिरले.
**– अतुल नारायण गुल्हाने,**
महावीर नगर, दारव्हा–

# अमरावती विभागात पावसाचा जोर, तब्बल २३ धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू

## अप्पर वर्धाचे ९ गेट ३० से.मी. ने उघडे, ३३५ क्यूसेक विसर्ग सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती :–** गेल्या काही दिवसांत पश्चिम विदर्भात सुरू असलेल्या दमदार पावसामुळे धरणांमधील जलसाठा वाढला असून चार मोठ्या प्रकल्पांसह एकूण २३ सिचन प्रकल्पांमधून पाणी सोडण्यात येत आहे. शुक्रवारी रात्री ९ वाजता पुन्हा विभागातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणाची सात दारे ३० सेंटीमीटरने उघडण्यात आली. या धरणामधून ३३५ क्यूसेक विसर्ग सुरू आहे. तत्पूर्वी गुरुवारला या धरणाचे प्रथम ३ गेट नंतर ७ उघडले होते. तसेच शुक्रवारला त्यातील दोन गेट बंद करून ५ गेट उघडे ठेवण्यात आले. मात्र दुपारी पाण्याचा येवा वाढल्याने ४ वाजता ९ गेट ओपन करण्यात आले त्यानंतर ५ तासाने ९ वाजता यातील दोन गेट बंद केले. वर्धा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत.

अमरावती विभागातील एकूण ९ मोठ्या प्रकल्पांपैकी यवतमाळ जिल्ह्यातील पूस प्रकल्पाची दारे ३१ सेंटिमीटरने उघडण्यात आली असून ८०.१० क्यूमेक विसर्ग सुरू आहे. बेंबळा प्रकल्पाची २ दारे १० सेंमी उघडण्यात आली आहेत. १६ क्यूमेक विसर्ग सुरू आहे. अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा आणि बुलढाणा जिल्ह्यातील पेनटाकळी प्रकल्पाची दारे बंद करण्यात आली आहेत. खडकपूर्णा प्रकल्पाच्या ३ दारांमधून २०४.६९ क्यूमेक विसर्ग सुरू आहे. एकूण २७ मध्यम प्रकल्पांपैकी अमरावती जिल्ह्यातील शहानूर, चंद्रभागा, पूर्णा, सपन, यवतमाळ जिल्ह्यातील अधरपूस, सायखेडा, गोकी, वाघाडी, बोरगाव, नवरगाव, अकोला जिल्ह्यातील निर्गुणा, मोर्णा, घुंगशी बॅरेज, वाशीम जिल्ह्यातील अडाण, सोनल, एकबुर्जी, ज्ञानगंगा, बुलढाणा जिल्ह्यातील कोराडी, मन आणि उतावळी या प्रकल्पांमधून सध्या पाणी सोडण्यात येत आहे. अप्पर वर्धा प्रकल्पांचा जलसाठा ९२.६७ टक्के इतका झाला आहे. मध्यम प्रकल्पांमध्ये ६१४.८० दलघमी म्हणजे ७९.६७ टक्के, तर लघु प्रकल्पांमध्ये ७१७.३२ दलघमी म्हणजे ७७.०७ टक्के जलसाठा झाला आहे. विभागातील सर्व



प्रकल्पांमध्ये २५०२ दलघमी (८०.६७टक्के) पाणीसाठा झाला आहे. विभागातील अनेक मोठ्या आणि मध्यम प्रकल्पांचे पाणलोट क्षेत्र हे मध्य प्रदेशच्या सीमेवर आणिसातपुडा पर्वतरांगांमध्ये आहे. गेल्या काही दिवसांमध्येया भागात विखुरलेल्या स्वरूपात पाऊस सुरू आहे. विभागातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा प्रकल्पांसह इतर सर्व प्रकल्पांमध्ये पाणीसाठ्यात चांगली वाढ होताना दिसत आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत विभागातील मोठ्या प्रकल्पांमध्ये ७५.९० टक्के आणि मध्यम प्रकल्पांमध्ये ७६.१८ टक्के जलसाठा झाला होता. धरणांमध्ये आगामी काळात येवा वाढेल हा अंदाज घेत खबरदारीचा उपाय म्हणून अनेक धरणांमधून पाणी सोडण्यात येत आहे. काही धरणांचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत.

# जिल्ह्यात अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीला झाली सुरुवात

## अजूनही ३० टक्के जागा रिक्त; आज शेवटचा दिवस




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

जिल्ह्यात इयत्ता ११ वी प्रवेशासाठीची केंद्रीय ऑनलाइन प्रक्रिया सुरू असून, आतापर्यंत २८ हजारांच्या वरती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. मध्यंतरी ही प्रक्रिया सुरू असताना तांत्रिक अडचणींमुळे यादी जाहीर होण्यास उशीर झाला होता, मात्र आता प्रवेशाची विशेष फेरी सुरू झाली आहे. गुणवत्ता यादी शुक्रवार, २९ ऑगस्टला लागली असून शनिवार शेवटच्या दिवशी (३० ऑगस्टपर्यंत) विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यायचे आहेत, अशी माहिती प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली. शेवटची विशेष

यावर्षी प्रथमच अकरावीची प्रवेश प्रक्रिया ही संपूर्ण राज्यासह जिल्ह्यात ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. संपूर्ण पाच फेऱ्या आटोपल्या आहे. विशेष अंतिम फेनीला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात १० हजार २५८ म्हणजेच ३० टक्के जागा रिक्त राहिल्या आहेत. प्रवेश घेताना बहुतेक विद्यार्थ्यांनी कला व विज्ञान शाखेला प्राधान्य न देण्यात आले असून, वाणिज्यचे प्रवेश घटले आहेत. विद्यार्थ्यांना आलेल्या तांत्रिक अडचणी, प्रवेश फेऱ्यांची लांबलचक प्रक्रिया - यासारख्या कारणांमुळे यावर्षी जागा रिक्त राहिल्याचे शिक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे.जिल्ह्यात एकूण ४२ हजार १८० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी आजवर २८ हजार ४४५ विद्याथ्यर्थ्यांनी प्रवेश निश्चित केला असून, उर्वरित जागा रिक्त आहेत. यामध्ये १४ हजार ५२ सर्वाधिक प्रवेश हे विज्ञान शाखेत झाले असून त्या खालोखाल १९ हजार ४७९ विद्यार्थ्यांनी कला शाखेला पसंती दिली आहे. तसेच सर्वात कमी २ हजार ९१४ प्रवेश वाणिज्य शाखेत झाले आहे.

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा ऑनलाइन सामना करावा लागला. संकेतस्थळावर ताण येत असल्याने थोड्या प्रमाणात संकेतस्थळ संथ गतीने चालणे, तसेच प्रवेश शुल्क भरण्यामध्ये अडचणी, कॉलेज पसंती क्रम भरण्यामध्ये अडथळे येणे अशा अडचणी निदर्शनास आल्या. त्यामुळे शिक्षण विभागाने अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावरील काही बदल, नवीन पर्याय समाविष्ट केले. परंतु दरम्यानच्या काळात अनेकांनी वेगवेगळे पर्याय निवडून आपापलेप्रवेश निश्चित केले आहेत.

**आजवर झालेले प्रवेश**

कला-१९४७९, वाणिज्य-२९१४, विज्ञान-१४०५२, एकूण-२८४४५

# शाळांच्या संचमान्यतेसाठी आधार कार्डची अट नकोच; समितीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

आधार कार्ड व्हॅलिडेशन आधारित संचमान्यता करण्याचे आदेश आहेत. या विषयी प्राथमिक शिक्षक समितीने शालेय शिक्षणमंत्री दादाजी घुसे यांना निवेदनाद्वारे केली आहे. यामध्ये शाळांमध्ये प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या सत्यता पडताळणी संबंधाने आवश्यक आहे. याबाबत दुमत नाही. यासाठी मागील काही वर्षापासून विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड वैधतेच्या साहाय्याने संचमान्यता केली जाते. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या




प्राथमिक शाळेत येणारे काही विद्यार्थी हे आर्थिक दुर्बल घटकांसह मजुरीसाठी वारंवार स्थलांतर करणाऱ्या आणि भटक्या समाजातील असतात.

त्यांच्या आधार कार्डवरील नोंदी अनेकदा तारखेच्या आधार दाखल्या अभावी अचूक नसतात. काही वेळा जन्म पाल्याचे कार्डसुद्धा निघत नाही. आधार कार्डवरील नोंदी दुरुस्त करण्याचा सतत आग्रह धरला तरी पालक त्यांच्या दैनंदिन वैयक्तिक अडचणीमुळे तयार नसतात. असे विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत प्रविष्ट असले तरी आधार हॅलिडेशन होत नसल्याने सदर विद्यार्थी संचमान्यतेसाठी ग्राह्य धरले जात नाही. मात्र, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्ती आणि मोफत गणवेश अशा सर्व कार्ड कार्ड योजनांसाठी आधार व्हॅलिडेशन नसणारे विद्यार्थी पात्र असतात. केवळ संचमान्यतेसाठी अशा विद्यार्थ्यांना ग्राह्य धरले जात नसल्याने पुरेशी पटसंख्या असूनही आवश्यकतेपेक्षा कमी संख्येने म्हटले आहे. मात्र, प्रविष्ट विद्यार्थी शिक्षक पदे मंजूर होतात, निवेदनात संख्येची खात्री करायची असल्यास स्थानिक शाळांची पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत प्रत्यक्ष पट पडताळणी करणे सहज शक्य आहे. सदर शासन निर्णय रद्द करण्यासह आधार कार्ड आधारित पर्यवेक्षकीय यंत्रणेमार्फत पट संचमान्यता हा प्रकार बंद करून पडताळणी करणे आवश्यक आहे. संचमान्यता करताना आधार कार्डची अट काढून पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत पटपडताळणी करावी, समितीचे राज्याध्यक्ष विजय कोबे, अशी मागणी प्राथमिक शिक्षक सरचिटणीस राजन कोरगावकर, राज्य प्रतिनिधी राजेश सावरकर यांनी केली आहे.



# रानडुकराच्या हल्ल्यात शेतकरी जखमी; दहीगाव पूर्णा शेतशिवारातील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बेलोरा**

आसेगाव पूर्णा पोलिसस्टेशन अंतर्गत येणाऱ्या दहिगाव पूर्णा शेतशिवारात रानडुकराने इसमावर हल्ला चढविला. या घटनेत इसम जखमी झाला. ही घटना २८ ऑगस्टरोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास घडली.

आशिष अरुणराव वानखडे हे २८ ऑगस्टरोजी दुपारी ३ वाजताच्या दरम्यान शेतात असताना रानडुकराने त्यांच्यावर हल्ला चढवून त्यांना गंभीर जखमी केले.ही घटना माहिती होताच भाजपा जिल्हा सचिव नरेश बर्वे यांनी स्वतः आशिष वानखडे यांचा प्राथमिक उपचार करून त्यांनारुग्णालय, येथे शासकीय अमरावती पाठविण्यासाठी मदत केली, तसेच वनविभागाच्या कार्यालयाला तसेच आसेगाव पूर्णा पोलिस ठाण्यात माहिती देऊन तक्रार दिली.

# टाकरखेडा येथे वीज पडून तीन जण जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धारणी**

येथून तीन किमी अंतरावर असलेल्या टाकरखेडा गावालगत सायंकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान आकाशात विजांचा कडकडाट सुरू झाले. गावालगत शेतात मोहाच्या झाडावर वीज पडून बाजूच्या घरातील तीन जण जखमी झाले असून त्या घरातील सर्व विजेची उपकरणे जळाली आहेत.गावालगत शेतात वीज पडल्याने टाकरखेडा गावातील गणेश शंकर शेळके, रमेश शंकर शेळके व आनंद गणेश शेळके हे जखमी झाले असून यापैकी एक जण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. जखमींना तत्काळ रपत्निल्टा



रुगणालयात दाखलकरण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहे. याबाबत धारणी पोलिसांना माहिती दिल्यावर पोलिसांनी घटना स्थळाचा पंचनामा केला. टाकरखेडा गावातील अनेक घरातील पंखे, फ्रिज व टीव्ही इत्यादी साहित्य जळून खाक झाले आहे. यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.परतीच्या पावसाने मेळघाटमध्ये प्रचंड कहर केला असून नदी-नाले तुडुंब भरून जात आहेत. अचानक पाऊस व विजा चमकून वातावरण निर्मिती होत आहे. त्यामुळे केव्हाही वीज पडू शकते, अशी भीती गुराखी व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

# तलाठ्याच्या अंगावर ट्रॅक्टर नेऊन मारहाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०बेलोरा :**

तलाठ्याच्याअंगावर ट्रॅक्टर नेऊन त्यांना मारहाण केल्याची घटना चांदूरबाजार पोलिसस्टेशन अंतर्गत थुगाव पूर्णा येथे घडली.

विश्वजीत दिलीपसिंग बंगरे (३०) हे थुगाव येथील तलाठी आहे. पूर्णा नदीपात्रामध्ये रेती तस्करांवर कारवाई करण्यासाठी ते आपल्या कर्मचाऱ्यांसोबत गेले असता ट्रॅक्टरचालक अनिल राठी नदीतून रेती भरून ट्रॅक्टर घेऊन निघत होता. त्याला तलाठी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी हात देऊन थांबविले; मात्र तेवढ्यात ट्रॅक्टर मालक दुर्योधन पुंडलिक तायडे व त्याचा मुलगा चेतन दुर्योधन तायडे त्या ठिकाणी आले, त्यांनी चालकाला म्हटले की ट्रॅक्टर घेऊन पळून जा. तेव्हा तलाठी विश्वजीत भंगार हे ट्रॅक्टरच्या समोर आले असता आरोपींनी त्यांना मारहाण केली व तुला आम्ही मारून टाकतो, अशी धमकी दिली. एवढेच नव्हे तर त्यांच्या अंगावर ट्रॅक्टरसुध्दा नेला. घटनेची तक्रार तलाठी विश्वजीत दिलीपसिंग बंगरे यांनी चांदूरबाजार पोलिसांत दाखल केली असता ठाणेदार अशोक जाधव यांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास एपीआय भूषण बायसोने, कोमल ठाकूर करीत आहे.

# वरुड (बगाजी) ची महालक्ष्मीला ११८ वर्षांची परंपरा

## वर्धा नदीद्वारे महालक्ष्मीचे दर्शन घेण्याची परंपरा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०धा.रेल्वे**

तालुक्यातील वरुड (बगाजी) येथील ॲड. प्रदीप देशमुख यांच्याकडील महालक्ष्मी उत्सवास ११८ वर्षे पूर्ण होत आहेत. या उत्सवाचे महत्त्व अमरावती जिल्ह्यातील वरुड (बगाजी) व परिसरातील व्यक्तींना अनन्यसाधारण आहे


वरुड (बगाजी) येथील प्रगतीशिल शेतकरी कर्मयोगी स्व. बापूराव ऊर्फ काकासाहेब देशमुख यांनी या महालक्ष्मी उत्सवाचे महत्त्व समजून १०० वर्षापूर्वी ज्या गोरगरीब मागासवर्गीय, आदिवासी शेतकरी, शेतमजुरांना पूर्णवेळ जेवण मिळत नव्हते, अशा गावकऱ्याना महाप्रसादाच्या रुपाने ते आपल्या वाड्यामध्ये मिष्ठान्न भोजनासाठी निमंत्रित करीत असे गावकरी मोठ्या श्रध्देने त्यांच्या या सार्वजनिक कार्यामध्ये सहभागी होत असत. आजही हा कार्यक्रम त्यांचे सुपुत्र ॲड. प्रदीप देशमुख मोठ्या श्रध्देने करतात.पूर्वी हा सण देशमुखांकडील ऐतिहासिक गढीमध्ये आयोजित करण्यात येत असे. ही गढी सत बगाजी सागर धरणात गेलेली आहे. गढीला १०० फूट उंच चार मोठे बुरुज होते पूर्वेकडील बुरुजाजवळील चौकाल महालक्ष्मी बसविल्या जात होती, तर पाच वर्षातून एकदा वर्धा नदी माय (पौराणिक माय वशिष्ठा) निमित्ताने महापुराच्या देशमुखांच्या महालक्ष्मीचे दर्शन घेत असे. वाड्याला आंघोळ घालून अशा प्रसंगाला गावकरी स्वतःलाधन्य समजत असे. या उत्सवानिमित्त खंजेरी भजन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

# ई-पीक नोंदणीत सर्व्हर डाऊनचा ब्रेक शेतकरी कंटाळलेपीक नोंदणी रखडली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० नांदगाव खंडेश्वर**

शेतकऱ्याला शेती संबंधित कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असेल, तर आपल्या शेतातील पीकपेरा मोबाईलच्या माध्यमातून अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे; परंतु या ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेमध्ये नेहमीच सर्व्हर डाऊनचा अडथळा असल्याने शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या सर्व्हर डाऊनच्या ब्रेकमुळे परिसरातील शेतकऱ्यांची ई-पीक नोंदणी रखडली आहे.

शेतकरी दररोज शेतामध्ये जाऊन मोबाईलवरून ई-पीक नोंदणीचा प्रयत्न करतात; परंतु नेहमीच सर्व्हर डाऊन असल्याने नोंदणी होत नाही. दररोज सर्व कामे बाजूला सारून शेतकरी ई-पीक नोंदणी करता शेतावर जातोःपरंतु नोंदणी होईलच याची शेतकऱ्यांना शाश्वती नाही. मुदतीच्या आत ई-पीक नोंदणी झाली नाही, तर शासकीय योजनेचा लाभ घेण्यास अडथळा येण्याची शक्यता आहे. सर्व्हर डाऊनमुळे ई-



पीक नोंदणीची प्रक्रिया किचकट व डोकेदुखी वाढणारी ठरत आहे. शिवाय अनेक शेतकऱ्यांना मोबाईल विषयी अपुरे ज्ञान आहे. पीक नोंदणीची ऑनलाईन पद्धत तांत्रिकदृष्ट्या अडचणीची ठरत असून ग्रामीण भागात नेटवर्क समस्या सर्व्हरवरील भार यामुळे शेतकरी ई-पीक नोंदणीला वैतागला शासनाने या किचकट प्रक्रियेचा पुनर्विचार करून ई- पीक नोंदणीकरिता सोपी पद्धत लागू करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.


# श्री गजानन विजय ग्रंथ पारायण व पादुका दर्शन सोहळा

## कोंडेश्वर येथे १८ सप्टेंबरला भाविकांचा मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० अमरावती**

महाराजश्री गजानन महाराजांच्या कृपेचा लाभ भाविकांना मिळावा, यासाठी श्री ब्रम्हांडनायक सेवा चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती यांच्यावतीने श्री गजानन विजय ग्रंथ पारायण सोहळा व पादुका दर्शन सोहळा गुरुवार १८ सप्टेंबर २०२५ रोजी श्रीक्षेत्र कोंडेश्वर देवस्थान येथे आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यात जयपूर कोथळी (ता. मोताळा, जि. बुलढाणा) येथील श्री गजाननमहाराजांच्या पवित्र पादुका दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. सन १९०८ मध्ये गजानन महाराज जयपूर येथे गेले असता त्यांनी आपले परमभक्त भगवानराव देशमुख व सौ. अंबाबाई देशमुख यांच्या घरी तीन दिवस मुक्काम केला होता. त्यावेळी महाराजांनी देशमुख कुटुंबाला आपल्या पवित्र पादुका भेट स्वरूपात दिल्या होत्या.



अशा पवित्र पादुकांचे दर्शन, ग्रंथ पारायणाचे वाचन व श्रवण तसेच महाप्रसादाचा लाभघेण्यासाठी भाविकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# न. प.च्या वतीने पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अंजनगाव सुर्जी**

नगरपरिषदेच्यावतीने स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत अंजनगाव शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकरिता पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धकांकरिता लाखो रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहे.



या स्पर्धेमध्ये प्रस्तावित उपक्रमाची परीक्षा व गुणांकनानुसार करण्यात येणार असुन पर्यावरणपूरक गणेश मूर्तीची स्थापना व आरास विना थर्माकॉल, विना फटाके, टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ प्रतिकृती, वस्तू, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, इलेक्ट्रिक वाहन व सौर ऊर्जेबाबतजनजागृती, सायकल रॅलीचे आयोजन, प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम यावर नागरिकांचा संदेश देणारा देखावा, कचरा,विलगीकरणाबाबत जनजागृती संदेश, वातावरण बदल जनजागृतीबाबत देखावा, जनजागृती उपक्रम, स्वच्छ भारत विषयक पथनाट्य, चित्रकला व रांगोळी स्पर्धा (पर्यावरण व स्वच्छता) तसेच गणेश उत्सव मंडळाने २०० बीज गोळे तयार करणे व मोकळ्या जागेमध्ये फेकणे किंवा भारतीय प्रजातीच्या किमान १५ वृक्षाचे बीज संकलन करणे, या विषयावर नियम व अटीसह स्पर्धा आयोजित केल्या गेली आहे.यामध्ये प्रथम क्रमांकाचे विजेत्यास ५१,००० रूपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक ३१००० रूपये व ट्रॉफी, तृतीय क्रमांक २१००० रूपये व ट्रॉफी ठेवण्यात आले आहे. मोफत प्रवेश असणाऱ्या या स्पर्धेत जास्तीतगणेशोत्सव स्पर्धकांनी भाग घेण्यास स्पर्धक व मंडळांनी नगरपरिषद येथे संपर्क साधण्याचे आवाहन दादाराव डोलारकर, मुख्याधिकारी नगरपरिषद अंजनगाव सुर्जी यांनी केले आहे.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सहकुटुंब घेतलं लालबागच्या राजाचं दर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३०मुंबई**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. यावेळी त्यांच्यासोबत त्यांची पत्नी, मुलगा जय शाह, सून आणि नातवंडे उपस्थित होती. तसंच या दर्शनावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री आशिष शेलार, मंगल प्रभात लोढा, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मुंबई अध्यक्ष अमित साटम यांच्यासह अनेक मान्यवरांनी हजेरी लावली.

दरवर्षी लाखो भाविक या गणपतीचं दर्शन घेण्यासाठी लालबाग इथं येतात. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह देखील गेल्या कित्येक वर्षांपासून लालबागच्या राजाच्या दर्शनाला येतात. अमित शाह यांनी शनिवारी सकाळी लालबागच्या राजाच्या मंडपात येऊन पूजा-अर्चना केली आणि गणरायाच्या चरणी नतमस्तक झाले. त्यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या कार्याचं कौतुक केलं.

# उद्याला सोनपावलांनी माहेरवाशीण ज्येष्ठा गौरींचे आगमन होणार

## माहेरवाशिणींच्या स्वागतासाठी भक्त गण सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

गणपती बाप्पा मोरया'च्या गजरात झालेल्या बाप्पाच्या आगमन पाठोपाठ 'आली आली गौराई, सोन्यारूप्याच्या पावलानं, आली आली गौराई, धन धान्याच्या पावलानं,' असे म्हणत रविवारी (दि. ३१) सोनपावलांनी माहेरवाशीण ज्येष्ठा गौरींचे आगमन होणार आहे. त्यांच्या स्वागतासाठी घरातील महिलांसह आबालवृद्धांची एकच लगबग दिसत असून, त्यांच्या आगमनाची जय्यत तयारी सुरू आहे. या माहेरवाशीणीचे स्वागत ही महिलांसाठी जिव्हाळ्याची बाब आहे.



गणपती मांगल्याचे, तर महालक्ष्मी समृद्धीचे प्रतिक म्हणून ओळखली जाते. तिच्या प्रतिष्ठापनेनंतर घरामध्ये मांगल्य, सुख, समृद्धी, आनंद टिकून राहतो, अशी भाविकांची भावना आहे. माहेरवाशीण असलेल्या गौराई अनेक ठिकाणी पिढ्यांपिढ्या बसवल्या जातात, तर काही ठिकाणी हौस म्हणून, तर काही घरी नवसाच्या म्हणून बसवल्या जातात. काही ठिकाणी पितळेचे, तर काही ठिकाणी मातीचे मुखवटे असलेल्या, तर काही ठिकाणी खड्यांच्या रुपात त्या बसवल्या जातात. आपल्या लाडक्या बाप्पाचं आगमन झाल्यानंतर सर्वांना वेध लागतात ते ज्येष्ठा-कनिष्ठेच्या आगमनाचे. पंचागानुसार. त्यांच्या आगमनाचा मुहूर्त रविवार ३१ ऑगस्ट ला संध्याकाळी ५ वाजून २५ मिनिटांपर्यंत असला, तरी मात्र महिलांसह आबालवृद्धांची एकच धावपळ दिसून येत आहे, तर तरुणाई आपली सजावट अधिकाधिक कसे सुंदर होणार यामध्ये कार्यमग्न झाल्याचे पहायला मिळत आहे.

### बाजारपेठ गर्दीने फुलली

महालक्ष्मींच्या स्वागतासाठी बाजारपेठ फुलली आहे. त्यामुळे गौरी आगमनाच्या पूर्वसंध्येला शहरातील बाजारपेठेत उशीरापर्यंत महिलावर्गाकडून महालक्ष्मींसाठी साड्या, दागिने, सजावटी साहित्य, राशीवर ठेवण्यासाठी फळे, फराळ, रांगोळी, मखरे, फुल माळा आदींच्या खरेदीची लगबग दिसून आली.

### रेडिमेड साहित्याला पसंती

तीन दिवसांच्या मुक्कामाने घरी येणारी महालक्ष्मी संतुष्ट राहावी. तिच्या पाहुणपणात कुठेही कमतरता राहू नये म्हणून महिला कामाला लागलेल्या आहेत. फुलोऱ्यासाठी करंज्या, पापड्या, वेण्या, अनारसे, लाडू, चकल्या आदींचे महत्त्व आहे. हा फराळ तयार करण्यासाठी महिलांची लगबग सुरू असून, त्याचा दरवळ मनाला मोहिनी घालत आहे.

### गौराई शुभ मुहूर्त

गौरी आवाहन : रविवार, ३१ ऑगस्ट : संध्याकाळी ५ वाजून २५ मिनिटांपर्यंत

गौरी पूजन : सोमवार, १ सप्टेंबर : सकाळी ५ वाजून ५९ मिनिटे ते सायंकाळी ६ वाजून ४३ मिनिटांपर्यंत

गौरी विसर्जन : मंगळवार, २ सप्टेंबर : रात्री ९ वाजून ५० मिनिटांपर्यंत

# ओबीसींना दिलेल्या आश्वासनाचे काय?

## जरांगेंच्या विरोधात नागपुरात उपोषण सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नागपूर**

दोन वर्षांपूर्वी नागपुरातच आणि संविधान चौकात तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, असे आश्वासन दिले होते, मात्र आता मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण द्या या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत, त्यामुळे सरकारने प्रथम आम्हाला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी, असे स्पष्टमत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी व्यक्त केले.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले आहे. लाखो मराठा बांधव मुंबई दाखल झाले आहेत, मराठ्यांना आरक्षण द्या या मागणीसाठी दिवसेंदिवस सरकारवर दबाव वाढत चाललेला आहे. याच पार्श्वभूमीवर शनिवारी नागपुरात जरांगेच्या दबावाला सरकारने बळी पडू नये म्हणून दबाव निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने संविधान चौकात साखळी उपोषण सुरू केले आहे. सावनेरचे आमदार डॉ. आशीष देशमुख यांनी त्यांच्या समर्थकांसह संविधान चौकात उपोषण मंडपाला भेट दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय आमदार परिणय फुके हे सुद्धा उपोषण मंडपाला भेट देणार आहे. आमच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील ओबीसी बांधाव मुंबईत येऊन धडकेल असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# वोट चोर खुर्ची छोड आंदोलनाने अमरावतीत जनजागृतीचा आवाज बुलंद

## युवक काँग्रेस व एन.एस.यू.आय.चा निवडणूक प्रक्रियेतील 'मत चोरी' विरोधात निशाणा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०अमरावती**

भारतीय युवक काँग्रेस आणि नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (NSUI) यांच्या संयुक्त विद्यमाने, आज दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी अमरावती येथे वोट चोर खुर्ची छोड या आंदोलनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि मतदार यादीतील फर्जी नोंदींविरोधात आवाज उठवल्यानंतर हे आंदोलन करण्यात आले.

युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. उदय भानू आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. शिवराज मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन पार पडले. आंदोलनात युवक काँग्रेस व एन.एस.यू.आय.चे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अनेक स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रदर्शनादरम्यान महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसवर वोट चोर खुर्ची छोड, स्टॉप वोट चोरी आणि देश का नेता कैसा हो, राहुल गांधी जैसा हो अशा घोषवाक्यांचे स्टिकर्स लावण्यात आले. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोस्टर असलेल्या बसेसवरही हे स्टिकर्स लावून निषेध व्यक्त करण्यात आला.

आंदोलकांनी इलेक्शन कमिशन मुर्दाबाद, जब जब मोदी डरता है, पोलिस को आगे करता है आणि वोट चोर गद्दी छोड अशा जोरदार घोषणा दिल्या. हे आंदोलन युवक काँग्रेसच्या देशव्यापी वोटर अधिकार यात्रा या मोहिमेचा एक भाग होते.अमरावतीतील हे आंदोलन लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी युवक काँग्रेसचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून लोकशाही मूल्यांची जपणूक करत नागरिकांमध्ये सजगतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# आ. प्रवीण तायडेंचा बच्चू कडूंवर घणाघात २० वर्षांची नौटंकी संपली, आता सत्य समोर येईल

## खोट्या आरोपांचा पुरव्यासह केला पर्दाफाश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३० :अमरावती**

अचलपूर मतदारसंघातील निधी वळवला, विकासकामे रद्द केली, अशा खोट्या आरोपांचा पर्दाफाश करत आमदार प्रवीण तायडेंनी आज बच्चू कडूंवर तुफान हल्लाबोल केला. माझ्यावरचे सर्व आरोप हे केवळ खोटे, निराधार आणि जनतेला दिशाभूल करणारे आहेत. मी जे काही बोलतो ते पुराव्यानिशी बोलतो. अचलपूरच्या जनतेचा विश्वास माझ्यासाठी प्राणाहूनही अधिक आहे आणि तो कधीही तुटू देणार नाही, अशा ठाम शब्दांत तायडेंनी स्पष्टीकरण दिले.



भरगच्च पत्रकार परिषदेत तायडेंनी स्पष्ट केले की, गेल्या काही दिवसांपासून जाणूनबुजून खोट्या गोष्टी पसरवल्या जात आहेत. अचलपूर मतदारसंघातील विकासकामे थांबवली, निधी मोर्शी-बरूड येथे वळवला, अशा बातम्या काही जण पसरवत आहेत. पण यामध्ये थोडाही तथ्य नाही. हे आरोप मला अडकवण्याचा आणि बदनाम करण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले.

**बच्चू कडूंवर तुफान हल्ला**

तायडेंनी बच्चू कडूंवर थेट प्रहार करताना म्हटले की, गेल्या २० वर्षांत बच्चू कडूंनी अचलपूरच्या जनतेला फसवले. नौटंकी करून सत्ता भोगली, शेतकऱ्यांची दिशाभूल केली, पण एकही ठोस प्रकल्प या भागात आणला नाही. रोजगार निर्मितीच्या नावाखाली केवळ भाषणबाजी केली. प्रत्यक्षात मात्र शेतकरी, युवक आणि गोरगरिबांची अवस्था जसंच्या तसं राहिली.

त्यांनी पुढे सांगितले की, जनतेच्या प्रश्नांवर लढा देण्याऐवजी बच्चू कडूंनी केवळ स्टंटबाजी केली. आंदोलनाच्या नावाखाली गाजावाजा केला, पण अचलपूरच्या जनतेला विकासापासून वंचित ठेवले. आता स्वतः केलेल्या पापांवर पडदा टाकण्यासाठी माझ्यावर खोटे आरोप केले जात आहेत. पण जनता सर्व जाणते. नौटंकीचा पडदा कायमचा खाली येणार आहे.

**जनतेचा विश्वास कधीही तुटू देणार नाही**

तायडेंनी पत्रकार परिषदेत ठाम भूमिका मांडली - माझ्यावर कितीही खोटे आरोप झाले तरी मी घाबरणार नाही. अचलपूरच्या विकासासाठी, शेतकरी आणि गोरगरिबांच्या हक्कांसाठी मी जीवाची पर्वा करणार नाही. जनता माझ्यावर विश्वास ठेवून मला आमदार बनवले आहे. हा विश्वास मी कधीही तुटू देणार नाही. माझ्या कामाचा हिशोब मी कधीही जनतेसमोर मांडायला तयार आहे.

**खोटेपणाचा खेळ थांबवावा**

बच्चू कडूंवर थेट निशाणा साधत तायडेंनी म्हटले - २० वर्ष केवळ जनतेला फसवणे, खोटे स्वप्न दाखवणे आणि सत्ता उपभोगणे... हाच बच्चू कडूंचा इतिहास आहे.

शेतकरी, बेरोजगार, गरीब यांच्यासाठी एकही ठोस प्रकल्प नाही. आजवर फक्त नौटंकी करून मतदारांचा विश्वासघात केला गेला.

माझ्यावर खोटे आरोप करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालू आहे. पण आता हा खोटेपणाचा खेळ अधिक काळ टिकणार नाही.

पत्रकार परिषदेत तायडेंच्या आक्रमक भूमिकेमुळे उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच ऊर्जा दिसून आली. तायडेंनी केलेला बच्चू कडूंवरील हा हल्लाबोल म्हणजे विदर्भाच्या राजकारणात एक नवीन टप्पा ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

# राधे गणेशोत्सव मंडळाच्या सायकल रॅलीने नांदगाववासियांचे लक्ष वेधले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३०नांदगाव खंडेश्वर**

गणेशोत्सवानिमित्त नांदगाव खंडेश्वर येथील राधे गणेशोत्सव मंडळ व नांदगाव हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मतदान जनजागृती व स्वच्छतेचा संदेश देणारी तिरंगा सन्मान सायकल रॅली काढण्यात आली. चिमुकल्यांच्या सहभागाने ही रॅली लक्षवेधी ठरली.दरवर्षी सामाजिक उपक्रमांनी युक्त गणेशोत्सव साजरा करणाऱ्या राधे मंडळाने यंदा शासनाच्या राज्य महोत्सव उपक्रमाला साथ देत मतदानाची टक्केवारी वाढवणे व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा संदेश दिला.या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करताना नांदगाव हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रदीप ठाकरे म्हणाले, गणेशोत्सव साजरा करताना सामाजिक भान राखणं गरजेचं आहे. शासनाच्या जनजागृती मोहिमेत आपला हातभार लावण्यासाठी ही रॅली उपयुक्त ठरेल.सायकल रॅलीची सुरुवात नांदगाव हायस्कूल परिसरातून झाली. शहराच्या प्रमुख मार्गावरून ही रॅली मार्गक्रमण करत राधे गणेशोत्सव मंडळाच्या मंडपाजवळ समारोप करण्यात आला.याप्रसंगी ठाणेदार श्रीराम लांबांडे, जगदीश गोवर्धन, अजय बिसेण, तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रकाश मारोटकर उपस्थित होते.

# शहीद भगतसिंग गणेशोत्सव मंडळाच्या खाटू श्यामजी नरेश देखाव्याचे आमदार रवी राणा यांच्या हस्ते उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

राजापेठ येथील सुप्रसिद्ध शहीद भगतसिंग गणेशोत्सव मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्यदिव्य देखावा साकारण्यात आला असून, खाटू श्यामजी नरेश यांच्या देखाव्याचे उद्घाटन लोकप्रिय आमदार रवी राणा यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या उद्घाटन प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष अनुप अग्रवाल व सर्व पदाधिकाऱ्यांनी आमदार रवी राणा यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. या देखाव्याला पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती.



उद्घाटन प्रसंगी राजापेठ पोलीस ठाण्याचे ठाणेदार पुनीत कुलट, तसेच दिनेश सेठिया, गजानन रेवाळकर, विनोद गुहे, नितीन बोरेकर, प्रमोद सोनोने, सुरज मिश्रा, गुड्डू माहुलकर, अक्षय गावंडे, रत्नदीप पेठकर, डॉ. चैतन्य बुरखंडे, मनोज अग्रवाल, अनिल अग्रवाल, राहुल निकोरे, शेरू चव्हाण, मंगेश तटके, कुशल बोबडे, शेखर चव्हाण, मोहित भोजवानी, सागर तिवारी, कुणाल ठाकूर, अमित शिसोदिया, सतीश कुरोठिया, निलेश गहेलोद, पंकज गुप्ता, गजूभाऊ लसणकर, सुनील अग्रवाल, मिलिंद शिरभाते, सुधीर अग्रवाल, विष्णू लांजेवार, शुभम चव्हाण, मयूर मोरे, शुभम जिरापूरे, आकाश बैस, आकाश ठाकूर, अमित सातपुते, कैलास इटोरिया, मोंटूसिंग, ओमप्रकाश गहेलोद, ऋत्विक मामुरकर, साहिल शेळोकर, सुरज भुरले, अक्षय मामुरकर, सुमित माहोरे, प्रथमेश भगत, समीर अग्रवाल, निलेश लांजेवार, प्रसाद भगत, साहिल अग्रवाल आदी मान्यवर मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीश्यामजी नरेश यांचा हा देखावा मंडळाच्या नावाला साजेसा ठरत असून, भाविक आणि नागरिकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला आहे. गणेशोत्सव काळात हा देखावा दर्शनासाठी सर्वसामान्यांसाठी खुला असून, मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचाही आयोजन करण्यात येणार आहे.